दैनिक
# राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१२९ | बुधवार, दि.०३ सप्टेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## सर्वोच्च न्यायालयाने इथेनॉल वापराविरोधातील याचिका फेटाळली

### देशातील पाच कोटी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा

**पुणे । प्रतिनिधी**

**देशात पेट्रोलमध्ये इथेनॉल निर्मिती करण्यास बंदी घालण्याची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने नाकारली आहे. यामुळे देशातील ५ कोटी ऊस उत्पादकांना दिलासा मिळाला आहे, अशी माहिती स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजू शेट्टी यांनी सोशल मिडीयावर पोस्ट करून दिली आहे.**

देशात पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रण करण्यावरून जोरदार चर्चा सुरु आहे. याच पार्श्वभूमीवर पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रण न करता पर्यायी इंधनाच्या वापरासाठी मुभा द्यावी, अशी याचिका सर्वोच्च न्यायालयात करण्यात आली होती. या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई आणि न्यायमूर्ती के विनोद चंद्रन यांनी सुनावणी घेतली आहे. या सुनावणी दरम्यान याचिका फेटाळून लावण्यात आली आहे. या निर्णयामुळे देशातील शेतकऱ्यांना थेट लाभ झाल्याचा दावा शेट्टी यांनी केला आहे. ऊस, मका आणि धान उत्पादक शेतकऱ्यांच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेवर परिणाम झाल आहे. इथेनॉल निर्मितीमुळे साखर उद्योग स्थिरावल्यामुळे ५ कोटी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना त्याचा लाभ झाला आहे. तसेच यामुळे दरवर्षी ४० हजार कोटी थेट ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मिळत ◀◀ पान २ वर




### इथेनॉल वापरामुळे मोठे फायदे

शेट्टी यांनी केंद्र सरकारच्या धोरणांकडे लक्ष वेधलं. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी इथेनॉल धोरणाला चालना दिल्याने भारताच्या अर्थव्यवस्थेमध्ये परकीय चलनाची १ लाख ४४ हजार कोटी रुपयांची बचत झाली. इथेनॉल वापरामुळे देशात जवळपास ७३६ लाख टनांनी कार्बन उत्सर्जन घटलं असून ३० कोटी झाडे लावण्याच्या बरोबरीत आहे. असेही शेट्टी यांनी सांगितले.

## जेनेरिक औषधांवर २०० टक्के टॅरिफ?

### फार्मा कंपन्यांवर दबावाचा प्रयत्न

**वॉशिंग्टन । वृत्तसंस्था**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प देशात आयात होणाऱ्या औषधांवर २०० टक्के किंवा त्याहून अधिक टॅरिफ लावण्याचा प्लॅन आखत आहेत. यामुळे औषध उत्पादक कंपन्या अमेरिकेत त्यांचे उत्पादन वाढवू शकतात अशी अपेक्षा ट्रम्प यांना आहे. परंतु या कंपन्यांना पुरेसा वेळ मिळावा यासाठी हे टॅरिफ लागू करण्यासाठी एक ते दीड वर्षाची मुदत देऊ शकतात असे बोलले जाते.

भारत हा जगातील जेनेरिक औषधांचा प्रमुख निर्यातदार देश आहे. जर अमेरिकेने टॅरिफ लावले तर भारतीय औषध उत्पादन कंपन्यांना मोठे नुकसान होऊ शकते. त्यांच्या निर्यातीवर त्याचा परिणाम होईल. परंतु काही रिपोर्टनुसार, ट्रम्प प्रशासन चीनहून आयात औषधे आणि त्यांच्या कच्च्या मालावर अधिक ◀◀ पान २ वर

# मराठे पाच दिवस लढले अन् जिंकले !

## मराठ्यांचा ऐतिहासीक विजय, आरक्षणाबाबत सगळ्या मागण्या मान्य



**मुंबई । प्रतिनिधी**

**मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांनी २९ ऑगस्टपासून सुरू केलेले बेमुदत उपोषण मंगळवारी (दि.२) अखेर मागे घेतले. तत्पूर्वी, मंत्रीमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे–पाटील यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने जरांगे यांची भेट घेतली. त्यांना उपसमितीने घेतलेल्या निर्णयांची माहिती दिली. या निर्णयांबाबत जीआर काढावा अशी मागणी जरांगे यांनी केली. सरकारनेही या मागणीची पुर्तता केल्याने जरांगे यांनी सरकारचा जीआर स्विकारत आपले उपोषण मागे घेतल्याचे जाहीर केले. गेल्या पाच दिवसांपासून हे आंदोलन सुरू होते. या काळात मराठे लढत राहिले अन् अखेर ते जिंकले, अशा भावना या अनुषंगाने व्यक्त होतान दिसत आहेत.**

मागील चार दिवसांपासून राज्यातील मराठा आरक्षण प्रश्नी आंदोलन करणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाच्या मागणीला अखेर राज्य सरकारने मंजूरी दिल्याची माहिती मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे–पाटील आणि शिवेंद्रराजे भोसले यांनी दिली. त्यामुळे मनोज जरांगे पाटील यांचे आझाद मैदानावरील आंदोलन यशस्वी ठरले असून संपूर्ण मराठा आंदोलकांमध्ये एकच जल्लोष सुरु झाला. मनोज जरांगे पाटील यांना मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष आणि इतर मंत्रिगण भेटायला आले. त्यावेळी राज्याच्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत झालेल्या निर्णयाची माहिती राधाकृष्ण विखे–पाटील यांनी दिली. त्यानुसार हैद्राबाद गॅझेटीयरची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. तर सातारा संस्थानच्या गॅझेटची एक महिन्यात अंमलबजावणी करणार असल्याचे आश्वासन मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी दिले. त्यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी शासन निर्णयाच्या कच्च्या ड्राफ्टचे वाचन उपस्थित आंदोलकांसमोर केले. त्या कच्च्या ड्राफ्टला आंदोलकांसह सर्वांनी होकार कळविला, त्यानंतर साधारणतः तासाभरात राज्यपालांच्या सहीने हा शासन निर्णय जारी करणार असल्याचे आश्वासन राधाकृष्ण विखे–पाटील यांनी दिले. त्यावर मनोज जरांगे पाटील यांनी शासन निर्णय जारी झाल्यानंतर रात्री ९ वाजेपर्यंत मुंबई रिकामी करणार असल्याची घोषणा केली. यावेळी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील म्हणाले की, ◀◀ पान २ वर

### » जरांगे यांच्या मान्य झालेल्या प्रमुख मागण्या

*** हैदराबाद गॅझेटिअर प्रमाणे कुणबी नोंदी करण्यात येतील., * आंदोलकांवर दाखल झालेले सर्व गुन्हे या महिन्याभरात मागे घेण्यात येतील., * सातारा गॅझेटीअरप्रमाणेही कुणबी नोंदी करण्यात येतील., * आरक्षणाच्या आंदोलनात बळी गेलेल्या वारसांना नोकरी देण्यात येतील., * मराठा– कुणबी एक असल्याचा जीआर काढण्यात येईल.**

### » फसवणूक झाल्यास राज्यात एकही मंत्री फिरु देणार नाही

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला मोठे यश मिळाले आहे. मराठा समितीने हैदराबाद गॅझेट मान्य असल्याचे सांगितले आहे. त्यानुसार गावातील, नात्यातील, कुळातील लोकांना चौकशी करुन कुणबी प्रमाणपत्र देणार असल्याचे उपसमितीने मनोज जरांगे यांच्यासमोर मान्य केले. यानंतर जर जीआरमध्ये काही फसवणूक झाली तर महाराष्ट्रात एकाही मंत्र्याला फिरु देणार नसल्याचा इशारा, मनोज जरांगे पाटलांनी दिला आहे.

### » रक्तातील, नात्यातील ज्यांच्या नोंदी असतील त्यांना कुणबी सर्टिफिकेट मिळणार – देवेंद्र फडणवीस



मला कितीही शिव्या दिल्या, दोष दिले तरी मी सगळ्या समाजासाठी काम करणार. मराठा उपसमितीने एक चांगला तोडगा काढला आणि कायद्याच्या चौकटीत बसेल असा निर्णय घेतला. अशी पहिली प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. हैदराबाद गॅझेटची अंमलबजावणी झाल्यामुळे ज्यांच्या कुणबी नोंदी सापडतील त्यांना, त्यांच्या रक्तातील सर्वांनाच कुणबी सर्टिफिकेट मिळणार असल्याचे फडणवीसांनी जाहीर केले. मनोज जरांगे यांच्या आंदोलनाची सांगता झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस माध्यमांशी बोलत होते.

### मराठा बांधवांकडून आनंदोत्सव साजरा

उपोषणाची सांगता झाल्यानंतर मैदानावरील स्टेजवर गणपतीची आरती करुन गणपती बाप्पा मोरयाचा जयघोष करण्यात आला. राजेहो तुमच्यामुळे जिंकलो, आपल्या मागण्या मान्य झाल्या, असे म्हणताच आझाद मैदानासह राज्यातील अनेक जिल्ह्यात मराठा बांधवांकडून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. गुलालाची उधळण करत आरक्षण आंदोलनाचा विजयोत्सव झाला. यावेळी उपोषण सोडताना जरांगे पाटलांनी मराठा बांधवांना गावाकडे जाताना काळजी घेण्याचे आवाहन यावेळी केले.

### मनोज जरांगे आनंदात ढसाढसा रडले !

राज्य सरकारने त्यांच्या ८ पैकी ६ मागण्या मान्य केल्या आहेत. यानंतर मराठ्यांकडून विजयी जल्लोष केला जात आहे. यावेळी मनोज जरांगे यांना भावना अनावर झाल्याचे दिसून आले. हैदराबाद गॅझेट लागू केल्यानंतर जरांगे भावुक झाले. ते आनंदात ढसाढसा रडल्याचे पाहायला मिळाले. तसेच त्यांच्या चेहऱ्यावर समाधानही दिसत होते. ते पाहून आझाद मैदानही गहिरवल्याचे दिसून आले. जरांगे पाटलांच्या खांद्यावर हात ठेऊन राधाकृष्ण विखे पाटील यांना त्यांना धीर देण्याचा प्रयत्न केला.

## बीड–अहिल्यानगर रेल्वे मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनी होणार सुरू

### पंतप्रधान नरेंद्र मोदी लावणार ऑनलाईन हजेरी

**बीड । प्रतिनिधी**

मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन म्हणजे १७ सप्टेंबर या दिवसापासून बीड ते अहिल्यानगर नियमित रेल्वे सुरू होण्याची आशा निर्माण झाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार याच दिवशी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे ऑनलाइन या मार्गाला हिरवा झेंडा दाखवतील आणि बीडकरांचे स्वप्न पूर्णत्वास येईल.

रेल्वे मंत्रालयाच्या मध्य रेल्वे बोर्डाच्या हद्दीमध्ये येत असलेल्या ◀◀ पान २ वर

### हा आनंदाचा दिवस–सारडा

अहमदनगर –बीड – परळी या रेल्वेमार्गासाठी १९८३ पासून स्वातंत्र्य सैनिक रेल्वे आंदोलन कृती समिती पाठपुरावा करत आली आहे. या समितीतील अनेक स्वातंत्र सैनिक आता दिवंगत झाले आहेत. आता मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनापासून बीड ते अहिल्यानगर रेल्वे सुरू होत आहे, हे आमच्यासाठी आनंदाची बाब आहे. बीड ते परळी हा रेल्वे मार्ग देखील तातडीने सुरू होऊन परळी ते अहिल्यानगर अन परळी ते मुंबई रेल्वे सुरू व्हावी अशीच आमची अपेक्षा असल्याचे मत स्वातंत्र सैनिक रेल्वे आंदोलन कृती समितीचे अध्यक्ष जवाहरलाल सारडा यांनी व्यक्त केले आहे.


## एक वादळ शमले पण भुजबळांच्या एंट्रीने नवा ट्विस्ट !

राज्य लोकतंत्र

**भाग सहावा । सुभाष चौरे**

**बीड । पुणे : गमनापासून राज्यात मराठा आरक्षण मुद्दा चांगलाच गाजत आहे मंगळवारी पाचव्या दिवशी राज्य सरकारने आंदोलन करित मनोज जरांगे यांच्या मागण्या मान्य केल्या. ही आनंदाची बाब आहे. देवबाप्पानेही सरकारला सुबुद्धी दिली मात्र आता ओबीसी तेवढ्याच प्रखरतेने विरोध करण्यासाठी उठला असल्याचे दिसत आहे. विशेष म्हणजे गेले काही दिवस शांत असलेले राज्याचे मंत्री ओबीसी नेते छगन भुजबळ यांची यात एंट्री झाल्यामुळे आता पुन्हा नव्या वादाला तोंड फुटणार असून, हा नवा ट्विस्ट निर्माण झाला आहे. आता यावर पुन्हा सरकारची कसरतच होणार आहे.**

सध्या राज्यात एकच विषय तो म्हणजे आरक्षण. एकीकडे मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून आंदोलन सुरू तर दुसरीकडे ओबीसीच्या आरक्षणाला धक्का न लागता आरक्षण द्यावे ही ओबीसी नेत्यांची मागणी. या दोन्ही बाजूने पाहिले तर गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या मराठा समाजाच्या आंदोलनाला काही प्रमाणात यश मिळाले आहे. आझाद मैदानावर सुरू असलेले आंदोलन मंगळवारी मागे घेतले गेले ते विविध मागण्या मान्य केल्यामुळे. मात्र त्यापूर्वीच ओबीसीच्या आरक्षणाला धक्का लागू नये, जर ओबीसी मधून मराठा समाजाला आरक्षण दिले गेले तर दुसऱ्या दिवशी कोर्टात जाण्याचा थेट इशारा मंत्री छगन भुजबळ यांनी सरकारला दिला आहे. एवढेच काय पण मंत्री असूनही आपण ओबीसी नेता हे ठासून सांगितल्यामुळे छगन भुजबळ हे तेवढ्याच ताकतीने ओबीसीच्या संरक्षणासाठी उतरणार असल्याचे दिसत आहे. आता मराठा समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न काहीसा निकाली निघाला आहे, मात्र आता जर ओबीसी मध्ये समावेश होत असेल तर ओबीसी समाजही आता ताकतीने उतरणार असल्याचे दिसत आहे. मराठवाड्यामध्ये ओबीसी समाजाने घोंगडी बैठक आणि जनजागृती सुरू केल्या त्यामुळे छगन भुजबळांच्या आदेशानंतर पुन्हा नवे आंदोलन उभे राहते की काय असा प्रश्न सर्वसामान्यांना पडला आहे. गणपती बाप्पा, आपण सर्व जाणून असाल. आपल्याला याची माहिती आहे, एक प्रश्न सुटल्यानंतर दुसरा प्रश्न समोर उभा राहत असेल तर यावर राज्य सरकारची ◀◀ पान २ वर



## अग्रलेख

# सरकार अन् निवडणूक आयोगही हतबल

इंडिया आघाडीच्या वतीने बिहारमध्ये गेले १७ दिवस सुरू असलेली 'व्होट अधिकार यात्रा' पाटण्यातील जाहीर सभेने समाप्त झाली. बिहारमध्ये सध्या जी एसआयआर प्रक्रिया सुरू आहे, त्यातील गडबड घोटाळे आणि एकूणच देशातील निवडणूक प्रक्रियेत जे घोटाळे झाले आहेत त्याविषयी जनतेत जागृती करण्यासाठी आणि लोकांचा मतांचा अधिकार सुरक्षित ठेवण्यासाठी ही व्होट अधिकार यात्रा काढण्यात आली. काँग्रेस नेते राहुल गांधी आणि राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव यांनी काढलेल्या या यात्रेला स्थानिक नागरिकांनी चांगला प्रतिसाद दिला. गर्दीचा हा आकडा देशात राजकीय परिवर्तन घडवण्याचे संकेत देणारा आहे, असा विश्वास इंडिया आघाडीचे लोक व्यक्त करताना दिसतात. या संपूर्ण यात्रेत लोकांचा मताधिकार हे सरकार गैरमार्गाने कसा काढून घेत आहे याची माहिती हे नेते सामान्य जनतेला देताना दिसले.

तुमचा मताचा अधिकार गेला की तुमचा या देशात नागरिक म्हणून राहण्याचा अधिकारसुद्धा जाऊ शकतो, तुम्हाला मिळणारे रेशन आणि पेन्शनसुद्धा बंद होऊ शकते, असा इशारा देत जनभावनेला साद घालण्याचा प्रयत्न या व्होट अधिकार यात्रेतून झाला. या यात्रेतून किती राजकीय परिवर्तन होईल हा भाग वेगळा, पण जनतेच्या मनात एकूणच निवडणूक प्रक्रियेविषयी संशयाचे वातावरण निर्माण करण्यात मात्र ही व्होट अधिकारी यात्रा बर्यापैकी यशस्वी ठरली, असे म्हणावे लागेल. राहुल गांधी यांनी पाटण्यात झालेल्या समारोप सभेत मोदी सरकारच्या विरोधात आता 'हायड्रोजन बॉम्ब' फोडण्याचा इशारा दिला आहे. त्यांनी म्हटले आहे की महादेवपुरा मतदारसंघातील मत चोरी उघडकीला आणून आम्ही अणुबॉम्ब फोडला होता, आता आम्ही देशाच्या विविध भागातील निवडणूक गैरव्यवहाराचा त्याहीपेक्षा मोठा धमाका करणार आहोत आणि हा धमाका अणुबॉम्बपेक्षासुद्धा मोठा म्हणजे हायड्रोजन बॉम्बसारखा असेल असे त्यांनी म्हटले आहे. आता लोकांना राहुल गांधी यांच्या या हायड्रोजन बॉम्बची प्रतीक्षा असेल. अर्थात, तो हायड्रोजन बॉम्ब म्हणजे देशाच्या विविध भागात झालेल्या निवडणूक गैरव्यवहारांचाच पर्दाफाश असेल याचा अंदाज कोणीही बांधू शकतो.

राहुल गांधी यांनी महादेवपुरा मतदारसंघातील मतचोरीचे जे पुरावे सादर केले होते, ते पुरावे निवडणूक आयोगाने मान्य करायला नकार दिला आहे. त्यानंतर आता देशातील सन २०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकांमध्ये किमान ८० ठिकाणी गैरमार्गाने निवडणुकांचे निकाल फिरवण्यात आल्याचा दावाही राहुल गांधी यांनी अलीकडेच एका सभेत केला आहे. महाराष्ट्रात तर १००% मतचोरीचा प्रकार घडला आहे असे राहुल गांधी यांनी म्हटले आहे. त्यामुळे याच संदर्भातील सगळे पुरावे ते पुन्हा एकदा देतील आणि ते हायड्रोजन बॉम्बच्या क्षमतेचे असतील हा राहुल गांधी यांचा दावा काहीसा खळबळजनक वाटतो आहे. अर्थात, राहुल गांधी यांच्या या पुराव्यांना निवडणूक आयोग किती किंमत देते यावर बरेचसे अवलंबून आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर एक मूलभूत मुद्दा असा की, मतदार यादी तयार करण्याची प्रक्रिया जर संशयास्पद असेल तर त्यातील संशय दूर करणे हे निवडणूक आयोगाचे प्राथमिक काम आहे ते त्यांनी प्रामाणिकपणे केले पाहिजे. आपण जी निवडणूक प्रक्रिया राबवतो त्याविषयी लोकांनाच शंका येत असेल तर ते आपल्या प्रतिमेला मारक आहे याची जाणीव ठेवून निवडणूक आयोगाने तद्अनुरूप दुरुस्ती केली पाहिजे, पण निवडणूक आयोगच सध्या आडमुठ्या भूमिकेत गेलेला दिसतो आहे. त्यातून हे संशयाचे वर्तुळ आणखी गडद होत जाताना दिसते आहे. देशातील निवडणूक प्रक्रिया जर संशयाच्या भोवऱ्यात सापडणार असेल तर एकूणच लोकशाही प्रक्रियेला काही अर्थ उरत नाही. त्यामुळे हा संशय शक्य तितक्या लवकर दूर करून विरोधकांच्या आक्षेपांना समर्पक उत्तरे देण्याचे किंवा त्यांचे निराकरण करण्याचे काम निवडणूक आयोगाने तत्परतेने करण्याची गरज आहे. विरोधक आरोप करत राहणार, पुरावे देत राहणार आणि निवडणूक आयोग मात्र नकाराच्या भूमिकेतच राहणार असेल तर यातून देशातील एकूणच जनमानस विचलित होण्याचा धोका आहे, तो सामंजस्याने टाळला गेला पाहिजे. एक मात्र खरे की राहुल आणि तेजस्वी यांच्या या व्होट अधिकार यात्रेने बिहारमधील राजकीय वातावरण नक्कीच ढवळून निघाले आहे. या वातावरणाला सत्ताधारी एनडीए आघाडी समर्थपणे तोंड देऊ शकलेली नाही हेही अधिक स्पष्ट झाले आहे, त्यामुळे या व्होट अधिकार यात्रेचा मोठा लाभ इंडिया आघाडीला म्हणजेच पर्यायने राजदचे प्रमुख नेते तेजस्वी यादव यांना होऊ शकतो. पण निवडणुका अजून किमान तीन महिने लांबणीवर आहेत इतक्या कालावधीपर्यंत या व्होट अधिकार यात्रेचा इम्पॅक्ट टिकून राहील काय, हा यातील कळीचा मुद्दा आहे आणि जर हा इम्पॅक्ट टिकून राहिला आणि बिहारमध्ये सत्ता परिवर्तन झाले तर मात्र केंद्रातील मोदी सरकारपुढे मोठी आव्हानात्मक परिस्थिती निर्माण होऊ शकते हेही तितकेच खरे आहे.

## माजलगाव शहरातील टेंबे गणपतीची आज होणार स्थापना

**माजलगाव । प्रतिनिधी**

**संपूर्ण राज्यात नवसाला पावणारा अशी ख्याती असलेला व निजामकालीन परंपरा असलेल्या येथील श्री धुंडीराज टेंबे गणपतीची आज बुधवारी दि.३ सप्टेंबर रोजी परिवर्तन एकादशी दिवशी स्थापना करण्यात येणार आहे.**



लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन येथील ब्रम्हवृन्दानी गणपती उत्सव सुरू केला होता,निजाम राजवटीत या गणपतीला रजाकारांनी मिरवणूक अडवून परवानगी नाकारली म्हणून गणपती जागीच ठेऊन हैदराबाद येथे जाऊन परवानगी आणण्यात आली,त्यानंतर भाद्रपद एकादशी दिवशी स्थापना करण्यात आली हाच दिवस कायम राहीला व अजातगायत हीच परंपरा कायम आहे.या वर्षी तिथी प्रमाणे आज दि ०३ सप्टेंबर बुधवारी एकादशी दिवशी प्रथमच सायंकाळी ४:०० वाजता शिवाजी महाराज चौक येथून मिरवणूक काढण्यात येणार असून त्यामध्ये जालना येथील ७० जणांचा सहभाग असलेले ढोल पथक भक्तांचा उत्साह वाढवणार आहे.त्याच बरोबर कलश घेऊन महिलादेखील मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. ही मिरवणूक आंबेडकर चौक, हनुमान चौक, झेंडा चौक मार्गे भट गल्ली येथे जाऊन टेंबे गणपतीची स्थापना टेंबे गणपती कार्यालयात करण्यात येणार आहे.या वर्षी जवळपास आठ फूट उंचीची चिखल मातीची मूर्ती बनवण्यात आली आहे. मंडळाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त विविध देखावे दररोज सादर करण्यात येणार आहेत.या गणपतीचे विसर्जन सोमवारी दि.८ सप्टेंबर रोजी प्रतिपदेला होणार आहे. दरम्यान या गणपतीची स्थापना मिरवणूक आज पर्यन्तच्या काळात मठगल्ली, मजीद चौक झेंडा चौक अशीच निघत असे, मात्र यंदा रौप्य महोत्सवी वर्ष असल्याने त्यास व्यापक स्वरूप देण्याच्या हेतूने प्रथमच शिवाजी चौक येथून मिरवणूक निघणार असून त्यात भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन टेंबे गणेश मंडळाचे वतीने अध्यक्ष अनंत जोशी,कल्याण नरवाडकर,सुरेन्द्र जोशी, शिवाजी देशमुख,अनिल मुळी,राजू दाभाडे यांनी केले आहे.

## अंबाजोगाईत महिलेचा बसखाली येवून मृत्यू

अंबजोगाई । प्रतिनिधी

शहरालगत मोरेवाडी परिसरातील पाण्याच्या टाकीजवळ आज सकाळी झालेल्या अपघातात एका महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला. विजयमाला नानाभाऊ सरवदे (वय ५७, रा. केज) असे मृत महिलेचे नाव आहे. त्या स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात चतुर्थश्रेणी कर्मचारी म्हणून मागील ३५ वर्षापासून त्या कार्यरत होत्या. विजयमाला सरवदे नोकरीच्या निमित्ताने दररोज केजहुन अंबाजोगाईला ये-जा करत असत. आज सकाळी देखील त्या अंबाजोगाईला येण्यासाठी धारूरहून परळीच्या दिशेने निघालेल्या बसमध्ये (एमएच १४ एमएच २३४७) बसल्या. या बसने अंबाजोगाई येथे थांबा घेतल्यावर विजयमाला सरवदे या उतरू लागल्या. त्यावेळी त्यांच्या साडीचा पदर बसमध्ये अडकला आणि त्या खाली कोसळल्या. इतक्यात बस पुढे निघाली आणि त्यांच्या दोन्ही पायांवरून चाक गेले. तत्काळ त्यांना गंभीर जखमी अवस्थेत स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले, मात्र उपचारा पूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे रुग्णालयात शोककळा पसरली असून सहकारी कर्मचारी आणि स्थानिकांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे. पुढील तपास अंबाजोगाई पोलीस करत आहेत. दरम्यान, अपघातावेळी बस चालक नशेत होता, त्याच्या बेजबाबदारपणामुळे हा अपघात झाल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे. या अपघातासाठी जबाबदार असलेल्या बस चालकावर कठोर कारवाई करण्याची मागणी मयत महिलेच्या नातेवाईकांनी केली आहे

## भूमीपुत्र पुरस्कार विजेते चेतन सौंदळे यांचा वैद्यनाथ विद्यालयातील वर्गमित्रांकडून सत्कार



**परळी वै.। प्रतिनिधी**

**महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक लोकमत तर्फे बीड जिल्ह्यातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या प्रतिभासंपन्न व कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वांना भूमीपुत्र पुरस्कार प्रदान करण्यात आला. या पुरस्काराने गौरविण्यात आलेले माजी नगरसेवक श्री. चेतन सौंदळे यांचा वैद्यनाथ विद्यालयातील शालेय वर्गमित्रांच्या वतीने सत्कार करण्यात आला.**

हा पुरस्कार राजस्थान राज्याचे महामहीम राज्यपाल श्री. हरीभाऊ बागडे यांच्या हस्ते चेतन सौंदळे यांना प्रदान करण्यात आला होता. सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, धार्मिक व राजकीय क्षेत्रातील कार्याची दखल घेत हा सन्मान करण्यात आला. सत्कार समारंभास पनवेल महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त श्री. भारत राठोड, लातूर जीएसटी विभागाचे सहाय्यक आयुक्त श्री. गौरीहर स्वामी, पालम तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी श्री. किशोर धिवार, श्री वक्रेश्वर मंदिर देवस्थानचे विश्वस्त श्री. प्रकाश खोत, ॲड. दत्तात्र्य आंधळे, एकनाथ सावजी, प्रदीप श्रीनिवार, सुशेन दहीफळे, रमाकांत रेवडकर, उपेंद्र धुमाळ, राजकुमार साठे, नरहरी आसेवार, शैलेन्द्र आरविकर आदींसह मोठ्या संख्येने शालेय वर्गमित्र उपस्थित होते.

## आरोपीचे वकीलपत्र घेऊ नये अन्यथा लोकांचा रोष सहन करावा लागेल-अभयकुमार ठक्कर

**परळी वै.प्रतिनिधी**

**परळी शहर हादरवून सोडणाऱ्या रेल्वे स्थानकातील अत्याचार प्रकरणी थेट इशारा दिला आहे. ''या नराधम आरोपीचे वकीलपत्र कोणत्याही वकिलाने घेऊ नये, अन्यथा त्याला लोकांचा रोष ओढवून घ्यावा लागेल आसा ईशारा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपजिल्हाप्रमुख व माजी नगराध्यक्ष अभयकुमार उर्फ पप्पू अण्णा ठक्कर यांनी दिला आहे.**

दि. ३१ रोजी परळी रेल्वे स्थानकात घडलेल्या या अमानुष घटनेत पंढरपूर येथील केवळ सहा वर्षांच्या निरागस चिमुकलीवर स्टेशन परिसरातून उचलून नेऊन अघोरी पद्धतीने क्रुर लैंगिक अत्याचार करण्यात आले. बरकत नगरातील २७ वर्षीय आरोपीला पोलिसांनी अटक केली असून अंबाजोगाई येथील विशेष न्यायालयाने त्याला चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. ठक्कर म्हणाले की, ''या हैवानी कृत्याचा आम्ही तीव्र निषेध करतो. उद्या (दि.३) परळी शहरात सर्वपक्षीय बंद पाळण्यात येणार आहे. व्यापारी, व्यावसायिक व सर्व नागरिकांनी दुकाने बंद ठेवून या बंदला मोठ्या संख्येने प्रतिसाद द्यावा. आपल्या एकात्मतेतूनच या चिमुकलीला न्याय मिळवून देता येईल असे सांगून ते म्हणाले की, ''नराधमाला समाजात जागा नाही फाशी झालीच पाहिजे..! न्याय मिळेपर्यंत आमचा संघर्ष सुरूच राहील.



## ज्ञानदीप विद्यालयाच्या दोन विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

तालुका क्रीडा कार्यालय व जनता माध्यमिक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आज जनता माध्यमिक विद्यालय, धारूर येथे तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेचे थाटात आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत ज्ञानदीप प्राथमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी करत यशाची घोडदौड कायम ठेवली.

या स्पर्धेत कुमारी अक्षरा आनंद कपाळ व कु. गुंजन गणेश करपे या दोन्ही विद्यार्थिनींनी



उत्कृष्ट खेळी सादर करत जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी आपले नाव नोंदवले आहे. त्यांचा हा मानाचा बहुमान विद्यालयासाठी अभिमानाचा क्षण ठरला आहे. या यशाबद्दल तालुका क्रीडा अधिकारी सौ. राखी यादव, जनता माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. सीमा गायकवाड तसेच उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थिनींचा सत्कार करून त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. ज्ञानदीप विद्यालय संस्थेचे सर्व पदाधिकारी, विद्यालयाचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षकवृंद व पालक वर्ग यांनीही या यशाचा गौरव केला. विद्यार्थिनींना मार्गदर्शन करणारे क्रीडा शिक्षक श्री. मुंजाराम निरडे सर यांचे विशेष कौतुक करण्यात आले.

## पान ६ वरून...

### गणपती उत्सवाप्रमाणे आपले

नवनित कॉवत यांनी विद्यार्थ्यांसोबत मनमोकळा संवाद साधला. विद्यार्थांना मार्गदर्शनही केले. त्यांनी जीवनात एकोपा, शिस्त आणि सकारात्मक दृष्टिकोन जोपासण्याचे महत्व विद्यार्थांना पटवून दिले. त्यांनी सांगितले की, गणपती उत्सवाप्रमाणे आपले जीवनही आनंदी आणि उत्साही असावं. ताणतणावात जगण्याऐवजी तणावमुक्त जीवन जगणं हीच खरी प्रगती आहे. प्रसंगी विद्यार्थ्यांनी पोलीस अधीक्षकांना यांच्याशी मनमोकळा संवाद साधत त्यांना विविध सामाजिक उपक्रमांबद्दल माहिती विचारली. महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी पोलीस प्रशासनाबाबतची रांगोळी काढून मान्यवरांचे स्वागत केलं. पोलिस अधीक्षक यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साह आणि आत्मविश्वास निर्माण झाला.

**माणूस उभा आहे वर्दीतला, म्हणून सण साजरा होतोय गर्दीतला**

आदित्य शिक्षण संस्थेच्या वतीने पोलिसांची कार्यतत्परता आणि कर्तव्य कठोरता दाखवणार रांगोळी काढण्यात आली होती. या रांगोळीतून माणूस उभा आहे वर्दीतला, म्हणून सण साजरा होतोय गर्दीतला हा महत्वपूर्ण संदेश देण्यात आला होता. ही रांगोळी पाहुण पोलिस अधीक्षक नवनित कॉवत यांनी विद्यार्थ्यांचे कौतूक करत पोलिसांप्रति असलेली संवेदना रांगोळीतून मांडल्याबद्दल मला आनंद झाल्याच्या भावना व्यक्त केल्या.

--------

### पाटोद्यात पोलीस कर्मचारी

असल्याची माहिती दिली आहे सदस्य कारवाईला सूचित प्रतिबंधक विभागाचे पोलीस अध्यक्ष माधुरी केदार अप्पर पोलीस अध्यक्ष शशिकांत शिंगारे पुणे उपाध्यक्ष यांच्या मार्गदर्शक मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक समाधान कवडे सर पोलीस उपनिरीक्षक सुरेश सांगळे. मच्छिंद्र बिडकर पांडुरंग काचगुडे अनिल शेळके. गणेश मैत्री संतोष राठोड अविनाश गवळी प्रदीप सुरवसे राजकुमार आघाव सचिन काळे बिबीशन सांगळे अंबादासपुर यांनी केली.

------------

### सिंदफणाच्या ६ मुलींची

विशेष कौतुक करण्यात आले आहे. आमच्या मुली-मुलांनी दाखवलेली ही कामगिरी महाराष्ट्राच्या खेळप्रेमी जनतेसाठी अभिमानाचा विषय आहे. साऊथ झोन २ स्तरावरील या विजयाने राष्ट्रीय मंचावर आमच्या प्रतिभावान खेळाडूंना संधी मिळवून दिली आहे. मला खात्री आहे की भोपाळच्या राष्ट्रीय स्पर्धेत आमचे खेळाडू महाराष्ट्राचा झेंडा उंच फडकवतील आणि देशभरातील प्रतिस्पर्ध्यांना आव्हान देतील. मंगलाताई प्रकाशदादा सोळंके ( सचिव, सिंदफणा पब्लिक स्कूल, माजलगाव.)

---------------

### कपास किसान मोबाईल

नाही. कापूस पिकाची नोंद करण्यासाठी सातबारा उतारा, सातबारा उताऱ्यावर कापूस पिकाची नोंद, वैध आधार कार्ड, शेतकऱ्याचा फोटो ही कागदपत्रे आवश्यक आहेत. त्यामुळे शेतकरी बांधवानी कपास किसान मोबाईल पव्दारे कापुस विक्रीसाठी नोंदणी करावी असे आवाहन बाजार समितीचे सभापती जयदत्त अण्णा नरवडे,उपसभापती श्रीहरी मोरे,सचिव हरिभाउ सवणे यांनी केले आहे.

--------

### तलवाडा येथील सार्वजनिक

गेल्यावर दखल घेणार का असा प्रश्न वाटसरु व वाहन चालकातुन उपस्थित होऊ लागला आहे. मागच्या घटनेत बस चालकाकडुन मोठा अनर्थ टळल्याची या वेळी चर्चा ऐकावयास येत असुन याच मुख्य रस्त्याला गाव तलावची संरक्षण भींत असुन संरक्षण भींत ते मुख्य डांबरी रस्ता आतिक्रमण धारकांनी पुर्णपणे वेढला आसल्याने बस स्थानकाकडे जाणा-या शासकीय बसेस सह खाजगी वाहन चालकांना तारेवरची कसरत करत वाहन चालावे लागत असल्याचे अनेक वेळा दिसुन आलेले आहे. अनेक बस चालकांनी बसेस ऊभे करुन तलवाडा येथील पत्रकार व लोकप्रतिनिधींना या रस्ता रुंदी करना बाबत विनंती केलेली आहे. या रस्त्याच्या अतिक्रमण धारकांनी तलवाडा गाव तलाव संरक्षण भींत सुद्धा कोरुन गाव तलावाच्या संरक्षण भींतीला धोका तर निर्माण केलाच आहे जेणे करुन गाव तलाव फुटण्याचा धोखा वाढलेला दिसुन येत असतांनाच संरक्षण भींत ते मुख्य डांबरी सडक पर्यंत अतिक्रमण वाढल्याने रहदारीला मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण होत असल्याचे प्रथम दर्शनी दिसुन येते. याच मुख्य डांबरी रस्त्याने सर्व शासकीय कार्य लये शाळा, कालेज, शासकीय रुग्णालय,बस स्थानक, बँका, पिण्याच्या पाण्याची सार्वजनिक बारव आणि जे या अतिक्रमण धारकांना वाचविण्यासाठी प्रयत्न करीत आहे ती ग्रामपंचायत सुद्धा याच रस्त्यावर असल्याने मोठी दुर्घटना होण्याची शक्यता या निमित्ताने वर्तवली जात असुन संबधित प्रशासन एखाद्याचा जिव गेल्यावर हे अतिक्रमण हाटवणार आहे का असा सवाल तलवाडाकर व पंचक्रोशीतील नागरिकांनी या निमित्ताने उपस्थित केला आहे.

-----------

### मराठा आरक्षणाच्या मागण्या

उपोषण सुरू केले.जिकडे तिकडे मोठ्या प्रमाणात सर्वत्र मराठा बांधवांची गर्दी झाल्याने मुंबई चे जनजीवन विस्कळीत होऊन मुंबई संपूर्ण ठप्प झाली होती.सरकारला न इलाजास्तव संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या मागण्या पूर्ण कराव्या लागल्या मराठा समाजाच्या मागण्याचा निर्णय घोषित होताच वडवणी तालुक्यासह ग्रामीण भागात फटाक्यांच्या आतिषबाजी तोफांची सलामी देत गुलालाची उधळण करत, मनोज दादा जरांगे पाटील तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है,छत्रपती शिवाजी महाराज की जय,जय जिजाऊ जय शिवराय,लढेंगे जितेंगे हम सब जरांगे, एकच पर्व ओबीसी सर्व, ओबीसीचा नेता कैसा हो जरांगे पाटील जैसा हो, जरांगे पाटलाचा बालेकिल्ला बीड जिल्हा बीड जिल्हा अदी घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

-------------

## पान १ वरून...

### जेनेरिक औषधांवर

फोकस करत असल्याचे सांगितले जाते. औषधांवर २०० टक्क्यांपर्यंत टॅरिफ लावण्यामागे ट्रम्प यांचा मुख्य हेतू फार्मा कंपन्यांवर दबाव टाकून त्यांना त्यांचे उत्पादन अमेरिकेत स्थलांतरित करायला लावणे हा आहे. तज्ज्ञांच्या मते, इतक्या उच्च टॅरिफचा उलटा परिणाम अमेरिकेवरच होऊ शकतो. त्यातून औषधांच्या किंमती वाढणे आणि औषधांचा तुटवडा निर्माण होण्याचा धोका आहे. विशेषत: जेनेरिक औषधे, जे आधीच कमी नफ्यावर विकली जातात, त्यावर याचा प्रभाव पडू शकतो. २५ टक्के टॅरिफही अमेरिकेत औषधांचा खर्च जवळपास ५१ अब्ज डॉलरपर्यंत वाढवू शकतो. डोनाल्ड ट्रम्प यांच्या या प्रस्तावित निर्णयामुळे औषध कंपन्या आणि उद्योजकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

----------

### सर्वोच्च न्यायालयाने इथेनॉल

आहेत. राजू शेट्टी म्हणाले, ''देशातील क्रूड ऑईल व्यापारी, काही परदेशी बनावट गाडीच्या कंपन्या यांनी पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रण करण्यात येवू नये, अशी मागणी केली होती. त्यासाठी सर्वोच्च न्यायालयात आव्हान याचिका दाखल केली होती. परंतु सर्वोच्च न्यायालयाने याचिकां फेटाळून लावली आहे.'' असे त्यांनी सांगितले. सध्या देशात पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिश्रण केलं जातं. त्यामुळे उसापासून आणि धान्यांपासून १ हजार ६८५ कोटी लिटर इथेनॉलचं उत्पादन घेतलं जातं. परंतु देशातील मुठभर क्रूड ऑईल व्यापारी आणि काही वाहन कंपन्या स्वत:च्या स्वार्थासाठी इथेनॉलबाबत गैरसमज पसरवत असल्याचे शेट्टी यांनी सांगितले. तसेच ब्राझील अमेरिका यासारख्या प्रगत राष्ट्रांमध्ये इंधनात सर्रास इथेनॉलचा वापर केला जात असताना भारतामध्ये त्यावर बंदी घालणे म्हणजे कुटनीतीचा भाग आहे. सर्वोच्च न्यायालयाने ऐतिहासिक निर्णय घेऊन भारताच्या अर्थव्यवस्थेबरोबरच ग्रामीण, पर्यावरण व कृषी क्षेत्राला दूरगामी फायदे होणार असल्याचे शेट्टी म्हणाले.

------------

### मराठे पाच दिवस लढले अन् जिंकले !

आपण राज्य सरकारकडे प्रामुख्याने दोन मागण्या केल्या होत्या. त्यातील पहिली मागणी हैद्राबादचे गॅझेटीयर लागू करावे, त्यास राज्य सरकारने मंजूरी दिली आहे. त्यामुळे आपली प्रमुख मागणी मान्य झाली आहे. तर आपली दुसरी मागणी सातारा संस्थानचे गॅझेट लागू करण्यासंदर्भात होती. मात्र त्यातील काही तांत्रिक त्रुटीमुळे हे गॅझेट आता लगेच लागू करता येत नाही. त्यामुळे त्यास १५ दिवसात लागू करण्यात येणार आहे, त्यासाठी शिवेंद्र राजे भोसले यांनी पुढाकार घेऊन हमी दिली. त्यासाठी मंत्रिमंडळ उपसमितीला १५ दिवसाऐवजी १ महिन्याची मुदत देत असल्याचे मनोज जरांगे पाटील यांनी जाहिर केले त्यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आंदोलकांवर मुंबईत जे काही गुन्हे दाखल झालेले आहेत ते सर्व गुन्हे राज्य सरकार मागे घेणार असल्याचे आश्वासन उद्योग मंत्री उदय सामंत यांनी जरांगे पाटील यांना दिल्याचे सांगितले. तसेच मागील आंदोलनावेळी मराठा आंदोलकांवर जे काही गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले त्याबाबतच्या निर्णयाची माहिती राज्य सरकार शासन निर्णयात देणार आहे. त्याचबरोबर ज्या आंदोलनकांनी आपले प्राण गमावले त्यांना आर्थिक मदत आणि मृतांच्या कुटुंबातील वारसांना नोकरीच्या आश्वासनाचा उल्लेखही करण्यात येणार असल्याचे सांगितले. दरम्यान, राज्य सरकारच्या या निर्णयाचे संपूर्ण श्रेय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जाणार असल्याचेही यावेळी त्यांनी सांगितले. त्यानंतर आझाद मैदानावर मराठा आंदोलकांचा एकच जल्लोष सुरु झाला.

-----------

### एक वादळ शमले पण

कसरत म्हणावी लागेल. सध्या सरकारची अवस्था अडकित्यातील सुपारी सारखी झाली आहे. एकीकडे मराठा समाजालाही नाराज करायचे नाही तर दुसरीकडे ओबीसी समाजालाही खुश ठेवायचे आहे, पण ते करणार कसे.? ही सर्वात मोठी अडचण आहे. मराठा समाजाला ओबीसी मधून आरक्षण दिले तर ओबीसीच्या कोठ्यात मराठा समाज सामील होईल आणि त्याचा तोटा ओबीसींना होऊ शकतो मग त्यामुळे पुन्हा विरोध आणि दोन गट अशी परिस्थिती महाराष्ट्रात निर्माण व्हायला वेळ लागणार नाही. आजही मराठा आणि ओबीसी समाज लहान- मोठ्या भावाप्रमाणे गाव खेड्यात वागतात. मात्र असे काही विषय आले की जो तो समाज एकत्र येता. यातून रोष वाढला जातो. मंत्री छगन भुजबळ यांची पुण्यामध्ये पत्रकार परिषद घेऊन झालेली एंन्ट्री पाहता शासनाला आणखी एका समस्येला तोंड द्यावे लागणार असल्याचे दिसून येत आहे. जर ओबीसींच्या आरक्षणामध्ये घुसखोरी झाली तर लाखोच्या संख्येने ओबीसी मुंबईत धडकतील, असा इशारा त्यांनी दिला. आता त्यांच्या सक्रिय पाठिंब्यानंतर राज्यातील ओबीसी समाज खडबडून जागा झाला, हे नाकारता येणार नाही. गणपती बाप्पा काल आम्ही म्हणालो होतो या आरक्षणाचा प्रश्न तुम्हीच सोडवू शकता आणि आज तुम्ही ते दाखवून दिले. मात्र आता नवा विषय पुढे आणून ठेवला त्याचे काय. पण देवबाप्पा आपण जाणून आहात, तुम्ही यातूनही मार्ग काढाल यात शंका नाही आणि मार्ग निघावा हीच गणेश भक्तांची इच्छा आहे.

-------------

### बीड-अहिल्यानगर रेल्वे मराठवाडा

अहिल्यानगर -बीड -परळी या १६१ किलोमीटर लांबीच्या मार्गाचे काम आता पूर्ण होत आले आहे. विशेषतः आता अहमदनगर ते बीड या रेल्वे मार्गाचे काम पूर्ण झाले असून, या मार्गावरील विद्युतीकरण देखील पूर्ण झाले आहे. अहिल्यानगर ते परळी या रेल्वे प्रकल्पाचा ४९५८ कोटी रुपयाचा खर्च झाला आहे. सुरुवातीच्या काळात अहिल्यानगर ते आष्टी पर्यंतचा मार्ग पूर्ण झाला होता. या मार्गावर काही दिवस रेल्वेच्या फेऱ्या झाल्या मात्र इंधनावर रेल्वे परवडणारी नसणारी ती बंद करण्यात आली. मात्र आता विद्युतीकरणाचे काम थेट बीडपर्यंत पूर्ण झाले आहे तर बीड पासून वडवणी आणि पुढे परळी पर्यंतचा काही भाग रेल्वे पटरी आणि विद्युतीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे. गेल्या अनेक वर्षापासून बीडला रेल्वे यावी यासाठी अनेकांनी आंदोलने केली परंतु आता बीड पर्यंतचे रेल्वे ब्रॉडगेजचे काम पूर्ण झाले असून, इलेक्ट्रिकल काम देखील पूर्ण झाले आहे. त्यामुळे १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन या दिवशी बीड ते अहिल्यानगर ही रेल्वे सेवा सुरू करण्याचा मानस रेल्वे विभागाने व्यक्त केला असून, अशा स्वरूपाच्या हालचाली देखील सुरू झाल्या आहेत. विशेष म्हणजे या रेल्वे मार्गाला आणि रेल्वेला खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी ऑनलाईन हिरवा झेंडा दाखवतील आणि ही रेल्वे सुरू होईल. यापूर्वी अहमदनगर ते नारायणगाव पुढे नारायणगाव ते सोलापूरवाडी त्यानंतर सोलापूरवाडी ते आष्टी पुढे आष्टी ते अंमळनेर. अंमळनेर ते विघनवाडी आणि आता विघनवाडी ते बीड या रेल्वेस्थानकाचे आणि रेल्वे पटरीचे काम टप्प्याटप्प्याने पूर्ण झाले आहे. त्यामुळे आता अवघ्या काही दिवसांमध्ये म्हणजे मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनी ही रेल्वे सुरू होत आहे.

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

बुधवार दि. ०३ सप्टेंबर २०२५ ३

## थोडक्यात...




दिंद्रुड: श्री शार्दुलेश्वर शिक्षण संस्था माजलगाव संचलित रेणुबाई देवी विद्यालय देवडी चे शिक्षक श्री. अंगद शिंगणे सर हे सेवानिवृत्त झाले असता त्यांचा सहपत्नी सत्कार खोलेश्वर परिवाराचे संस्थापक अध्यक्ष दिलीपराव पारेकर, उपाध्यक्ष प्रकाश कुलकर्णी, संचालक प्रताप शेंडगे,गणेश काशीद सर, पांडुरंग वाकसे सर,रोहिणी पारेकर मॅडम,विलास पारेकर, व खोलेश्वर कर्मचारी या सर्वांच्या उपस्थित करण्यात आला.

### ज्येष्ठा गौरीच्या आगमनाने पाटोदात उत्सवाचे वातावरण

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदाशी रात्र रविवारी सायंकाळी जेष्ठ गौरीचे पारंपरिक पद्धतीने आगमन झाले ढोल ताशाच्या गजरात




महिलांच्या मंगल प्लस मिरवणुकीत आणि पारंपरिक दिंड्यामध्ये शहरात उत्सवाचे वातावरण निर्माण झाले महिलांनी पारंपारिक पोषक परिधान करून गौरीची स्वागत केले घरात सजावट फुलांची आरस विद्युत रोष नाही रंगीबेरंगी रांगोळीची परिसर व जळून निघाला गौरी आगमनानंतर भक्ती भावाने पूजन करण्यात आले पुढील दोन दिवस पूजन धार्मिक विधी आणि संस्कृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे घरात गौरी पूजनाची तयारी सुरू असून महिलांनी पारंपारिक पदार्थाची चवदार मेजवानी सज्ज केली आहे गौरी पूजन महिलांसाठी आनंदाचा आणि सामाजिक ऐक्याचा सोहळा मानला जातो त्यामुळे महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे पाटोदा परिसरातील गल्ली वस्ती घरामध्ये भक्तीमुळे उत्साहामुळे वातावरण पाहायला मिळत आहे.

### कमलबाई वाघ यांचे निधन

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी येथील नामांकित वैद्यकीय तज्ञ डॉ.शंकर वाघ यांच्या आज्जी श्रीमती.कमलबाई बाबुराव वाघ यांचे



काल दि.१ सप्टेंबर २०२५ सोमवार रोजी सकाळी ६ वाजता राहत्या घरी वृध्दापकाळाने दुःखद निधन झाले. त्या ९५ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पार्थिवावर वैकुंठधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

याबाबत अधिक माहिती अशी की, वडवणी येथील प्रतिष्ठित नागरिक प्रमोद वाघ यांच्या मातोश्री तसेच येथील वैद्यकीय तज्ञ डॉ.शंकर वाघ व मुख्याध्यापक सचिन वाघ यांच्या आज्जी श्रीमती.कमलबाई बाबुराव वाघ यांचे वयाच्या ९५ व्या वर्षी काल सोमवारी सकाळी ६ वाजता वृध्दापकाळाने वडवणी येथील राहत्या घरी दुःखद निधन झाले आहे. त्या अतिशय धार्मिक वृत्तीच्या होत्या. पंढरपूरच्या विठ्ठलावर त्यांची निस्सीम भक्ती होती. आपले संपूर्ण कुटुंब सुशिक्षित, अध्यात्मिक व संस्कारी करण्यात त्यांचे मोठे योगदान राहिले आहे. त्यांच्या पश्चात कुटुंबामध्ये मुलगा, मुली, सुना, जावाई, नातवंड असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने संपूर्ण वाघ कुटूंबीयांवर शोककळा पसरली आहे. श्रीमती.कमलबाई वाघ यांच्या पार्थिवावर सोमवार रोजी दुपारी १ वाजता वडवणी येथील वैकुंठधाम स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. वाघ कुटुंबियांच्या दुःखात दैनिक राज्य लोकतंत्र परिवार सहभागी आहे.

### अनुकंपाधारक उमेदवारांच्या रिक्तपदाच्या नियुक्तीसाठी मेळावा संपन्न

बीड : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या १५० दिवसांच्या कार्यक्रमांतर्गत देण्यात आलेल्या एकुण १ ते ९ टप्प्यांमधील टप्पा क्र. ५ ( मेळावा घेणे व शिफारस करणे) पूर्ण करण्याच्या अनुषंगाने (दि. ०२) आजरोजी सकाळी ११.०० वाजता प्रतिक्षासूचीतील सर्व अनुकंपाधारक उमेदवार यांचा मेळावा घेवुन रिक्तपदांसाठी पसंतीक्रम विहित नमून्यामध्ये घेण्यात आले. गट-क संवर्गासाठी एकूण ४३ पदे रिक्त आहेत. या मेळाव्यास एकूण ९२ उमेदवारांपैकी ७९ उमेदवार उपस्थित होते. त्यांच्याकडून पसंतीक्रमाची माहिती विहित नमून्यामध्ये संकलित करण्यात आली. दि. १५ सप्टेंबर, २०२५ रोजी अनुकंपा नियुक्तीचे आदेश निर्गमित करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. या मेळाव्यासाठी १७ नियुक्ती प्राधिकारी उपस्थित होते. निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी कळविले आहे.

# सौताड्यात लाल काळया जुगाऱ्याकडून पर्यटकांना मारहाण

## गुन्हा दाखल करून घेण्यास पोलिसांकडून टाळाटाळ

पाटोदा । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सुप्रसिद्ध पर्यटन स्थळ मराठवाड्याचा मिनी महाबळेश्वर व धार्मिक तीर्थक्षेत्र म्हणून सौताडा हे गाव अहिल्यानगर व बीड जिल्ह्याच्या सरहद्दीवर वसलेले सुंदर गाव आहे. लाखो भाविक येथे पर्यटन व प्रभू श्रीरामाच्या दर्शनासाठी येथे येत असतात. असेच परभणी येथील प्रेस फोटोग्राफर अमोल काळे हे आपल्या कुटुंबा समवेत रामेश्वर सौताडा या ठिकाणी दर्शनाला आले होते .अमोल काळे आणि त्यांचे सहकारी मित्रांनी नातेवाईक या ठिकाणी लाल काळे सोरट जुगार चालवणारे काही गुंड प्रवृत्तीचे तरुण समोर येऊन आताच्या भाषेत शिवीगाळ करत धमकी देत,मारहाण करून अमोल चखाले राहणार चिखली त.आष्टी तालुका या साथीदाराच्या फोन पे वर जबरदस्तीने २००००/ रुपये ट्रान्सफर करायला भाग पाडले. व काही लोक स्वरूपात रक्कम घेतली हा सगळा प्रकार घडल्यानंतर अमोल काळे व त्यांचे संपूर्ण कुटुंब प्रचंड दहशतीखाली आले व त्यांनी पोलीस स्टेशन गाठले. तिथे गेल्यानंतर पोलीस दखल घेत नसल्याचे लक्षात येतात अमोल काळे यांनी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख स्वप्निल भैया गलधर यांना दूरध्वनी वरून सर्व हकीकत सांगितली व स्वप्निल भैया गलधर यांनी तात्काळ दखल घेत आमदार सुरेश आण्णा धस यांचे स्वीय सहायक सुशील ढोले यांना फोन करून संबंधित लूट व हानमार झालेल्या लोकांना मदत करण्याची विनंती केली. सुशील ढोले तात्काळ पोलीस स्टेशनला गेले व त्यांनी रीतसर तक्रार दाखल करून घ्या म्हणून ठाणे अंमलदार व बीट आमलदार यांना सांगितले परंतु सौताड्याचे बीट अंमलदार यांचे लाल काळे जुगाऱ्या सोबत आर्थिक हप्ते देवाण-घेवाण असल्यामुळे त्यावेळी कर्तव्यावर असणारे ठाणे अंमलदार आणि बिट अंमलदार यांनी तात्काळ जुगर्यांशी संपर्क केला .लागेबंधे असल्यामुळे त्या जुगा ऱ्यांना फोनवर संपर्क करत सावध केले की ,तुमच्यावर आता गुन्हा दाखल होत आहे. आमची इज्जत जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्यासमोर जाईल व तुमच्यावर ही गुन्हा नोंद होईल त्याच्यामुळे तुम्ही सेटलमेंट करा व त्यांचे पैसे परत करा अशा प्रकारचा संवाद व्हिडिओ कॉल व फोन द्वारे लाल काळया जुगारी व पोलीस ठाणे अंमलदार व बीट अंमलदार यांच्या मध्ये झाला व प्रेस फोटोग्राफर अमोल काळे यांना जुगार यांनी त्यांचे पैसे फोन पे द्वारे परत केले. गुन्हा दाखल करायचा सोडून पोलिसांनी लाल काळया जुगारांचीच बाजू घेतल्याने प्रचंड असंतोष व सामान्य नागरिकांच्या मनामध्ये चिड निर्माण झाली आहे. या जुगारांनी आतापर्यंत हजारो लोकांना अडवून, धमकावून ,प्रचंड मारहाण करून पैसे लुबाडले आहेत असे ट्रस्ट कमिटी व स्थानिक नागरिकांनी दबक्या आवाजात सांगितले . हे लाल काळे आणि जुगार चालवणारे लोक गुंड प्रवृत्तीचे असल्यामुळे यांच्या विरोधात कोणीही जाण्यास सहसा धजावत नाही याचाच गैरफायदा घेत शेकडो पर्यटकांची लूट या लोकांनी केली आहे

प्रभू श्रीरामाच्या पवित्र तीर्थक्षेत्र ठिकाणी अशा प्रकारची लूट होत असताना सुप्रसिद्ध

### बीट अंमलदार फक्त हप्ते गोळा करण्यात मग्न खासगी माणसाच्या मार्फत सौताडा परिसरात हप्ते वसुली

सौताडा गावचे बीट अंमलदार हे फक्त सौताडा गावाच्या परिसरामध्ये हप्ते गोळा करण्यासाठी फिरत असून त्यांनी स्वतः एका खाजगी इसमामार्फत सौताडा येथील पत्याचे क्लब दारूचे धंदे लाल काळे यांचे धंदे यांच्याकडून हप्ते गोळा केले जात आहेत यामुळे या बीटमलदाराची तात्काळ बदली करून त्याच्यावरती निलंबनाची कारवाई करावी अशी मागणी सर्वत्र होत आहे

पर्यटन स्थळ आता गुंड प्रवृत्तीने ,लुटारुंच्या जुगारामुळे कुप्रसिद्ध होत आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक साहेब आपण वेळीच कारवाई केली नाही तर भविष्यात याचा सर्वसामान्य माणसाला प्रचंड त्रास होणार आहे व सौताडा या पर्यटन स्थळ व तीर्थक्षेत्राची नाहक बदनामी होत आहे, ती कृपया आपण थांबवावी संबंधित गुन्हेगारावर संघटित गुन्हेगारी (मकोका )सारखा गुन्हा दाखल करून जेरबंद करावे अशी मागणी होत आहे जिल्ह्याच्या कायदा आणि सुव्यवस्थेच्या बाबतीमध्ये विविध धंद्याच्या बाबतीमध्ये आपली कामगिरी सरस व नजरेत भरणारी ठरलेली आहे परंतु आपल्याच पाटोदा तालुक्यातील पोलीस कर्मचाऱ्यांनी आपली पोलीस प्रशासनाची इज्जत चव्हाट्यावर आणली आहे .आपण या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित लोकांवर गुन्हे दाखल करावेत अशा प्रकारची मागणी विविध स्तरातील भाविक भक्त, ,तसेच स्थानिक नागरिकांनी केली आहे. हा सर्व प्रकार सौताडा वनविभागात होत असून याकडे वन विभागाचे अर्थपूर्ण दुर्लक्ष होत आहे . सौताडा वन विभागाच्या माध्यमातून श्री शेत्र रामेश्वर च्या प्रवेशद्वाराजवळ पार्किंग ची वसुली बेकायदेशीर केली जात आहे तसेच रामेश्वर प्रवेशद्वार व परिसरामध्ये दारुड्यांचा सुळसुळाट असून या दारुड्यांमुळे अनेकांना त्रास होत आहे तसेच येथे येणाऱ्या पर्यटकांना सुद्धा या दारुड्यांचा त्रास होत आहे. तरी आपण खात्याने याचाही बंदोबस्त करावा अशी मागणी सर्वसामान्य पर्यटकांमधून होत आहे

## ज्ञानदीप विद्यालयाच्या दोन विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

**तालुका क्रीडा कार्यालय व जनता माध्यमिक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आज जनता माध्यमिक विद्यालय, धारूर येथे तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेचे थाटात आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत ज्ञानदीप प्राथमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी करत यशाची घोडदौड कायम ठेवली.**



या स्पर्धेत कुमारी अक्षरा आनंद कपाळ व कु. गुंजन गणेश करपे या दोन्ही विद्यार्थिनींनी उत्कृष्ट खेळी सादर करत जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी आपले नाव नोंदवले आहे. त्यांचा हा मानाचा बहुमान विद्यालयासाठी अभिमानाचा क्षण ठरला आहे. या यशाबद्दल तालुका क्रीडा अधिकारी सौ. राखी यादव, जनता माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. सीमा गायकवाड तसेच उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थिनींचा सत्कार करून त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. ज्ञानदीप विद्यालय संस्थेचे सर्व पदाधिकारी, विद्यालयाचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षकवृंद व पालक वर्ग यांनीही या यशाचा गौरव केला. विद्यार्थिनींना मार्गदर्शन करणारे क्रीडा शिक्षक श्री. मुंजाराम निरडे सर यांचे विशेष कौतुक करण्यात आले.



**नवगण राजुरी:- मंगलमूर्ती देवस्थान नवगण राजुरी येथे गणेश उत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता श्रीक्षेत्र संस्थान नारायणगडाचे मठाधिपती महंत शिवाजी महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली. यावेळी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, अमृताश्रम स्वामी महाराज, अरुण डाके, हेमंत क्षीरसागर, यांच्यासह महिला - पुरुषांची उपस्थिती होती.**

### हुतात्मा स्मारकाची कायमस्वरूपी देखभाल व्हावी - मिलिंद सरपते

बीड । प्रतिनिधी



बीड शहरातील हुतात्मा स्मारकाची आठवण प्रशासनाला केवळ १७ सप्टेंबरला मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या कार्यक्रमावेळीच होते, असा प्रश्न उपस्थित करून स्मारकाची वर्षभर स्वच्छता व देखभाल करण्याची मागणी वंचित बहुजन आघाडी शहराचे नेते मिलिंद सरपते यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

सरपते यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे की, दरवर्षी कार्यक्रमाच्या काही दिवस आधी घाईघाईत स्मारक परिसराची स्वच्छता, रंगरंगोटी व सजावट केली जाते. मात्र उर्वरित वर्षभर या स्मारकाकडे दुर्लक्ष केले जाते. हुतात्म्यांना खरी श्रद्धांजली ही एका दिवसापुरती नसून त्यांच्या स्मृती वर्षभर जपण्यात आहे. त्यांनी स्मारकासाठी स्वतंत्र स्वच्छता पथक नेमावे, परिसरात नियमित प्रकाशयोजना व सौंदर्यीकरण करावे तसेच शाळा-महाविद्यालयांच्या माध्यमातून देशभक्तिपर उपक्रम नियमित आयोजित करावेत, अशी मागणी केली आहे. अन्यथा नागरिकांतून आंदोलनात्मक स्वर निर्माण होईल, असा इशारा सरपते यांनी दिला आहे.

## स्व.गोपीनाथराव मुंडे यांची आठवण नेहमीच येते - आ.गोरखे

वडवणी । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात ज्या-ज्या वेळेस येतो, त्या-त्या वेळेस मला स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेबांची नेहमीच आठवण येते. असा मत विधान परिषदेचे तरुण आ. अमित गोरखे यांनी व्यक्त केले आहे. ते दि.३१ ऑगस्ट २०२५ वार -शनिवार रोजी बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना रुई गांवचे उच्चभूषित सरपंच अँड . मयूरशेठ आंधळे यांनी ठेवलेल्या स्वागत कार्यक्रमात ते बोलत होते. तर अभूतपूर्व स्वागत केल्या प्रकरणी घरातल्या माणसांनी स्वागत केल्याचा प्रत्यय आला. असे देखील अमित गोरखे यांनी म्हटले आहे.



भारतीय जनता पार्टीचे प्रदेश प्रवक्ते, विधान परिषद आमदार, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळाचे माजी अध्यक्ष अमित गोरखे दि. ३० ऑगस्ट २०२५ रोजी बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर होते. तर दिंद्रुडकडे रवाना होत असताना वडवणी तालुक्यातील मौजे रुई गांवचे उच्चभूषित सरपंच अँड. मयूरशेठ आंधळे यांच्या वडवणी- बीड रोड वरील तिरुमला कार्यालय या ठिकाणी भव्य दिव्य अभूतपूर्व स्वागताचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आमदार अमित गोरखे यांचा अँड. मयूरशेठ आंधळे व मित्र परिवाराच्या वतीने भला मोठा जेसीबीच्या साह्याने हार घालून फटाक्याची आतिषबाजी करून स्वागत केले. भारतीय जनता युवा मोर्चाचे बीड जिल्हाध्यक्ष संजयभाऊ आंधळे यांनी यथोचित सत्कार करून स्वागत केले. या दरम्यान विविध सामाजिक व राजकीय गोष्टीवर चर्चा करण्यात आली. यावेळी आ. अमित घोडके म्हणाले की, बीड जिल्ह्यात ज्या-ज्या वेळेस येतो, त्या-त्या वेळेस मला स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेबांची आठवण येते व त्यांचा सामाजिक राजकीय वारसा आमच्या नेत्या पंकजाताई मुंडे व प्रीतमताई मुंडे या भगिनी खंबीरपणे चालवतात. बीडमध्ये आल्यावर मला आपल्या घरी व गावी आल्याचा प्रत्यय येतो. मला समाजाच्या मूलभूत प्रश्नासाठी पक्षश्रेष्ठींनी आमदारकी दिली आहे. ते प्रश्नांची सोडवण्यासाठी धडपड सुरू आहे. यात आर्टीचा प्रश्न मार्गी लावला. सामाजिक आरक्षणाचा अ, ब, क, ड वर्गीकरण करण्याचे काम शेवटच्या टप्प्यात आहे. यासह अन्य सामाजिक प्रश्न मार्गी लावले आहेत. त्याचबरोबर आज अँड. मयूर आंधळे यांनी जो माझा सत्कार केला आहे. तो अभूतपूर्व केला आहे. घरातल्या माणसाने सत्कार केल्याचा प्रत्येक आज आला आहे. असे यावेळी म्हणाले आहेत. हा दौरा यशस्वी करण्यासाठी बोरफडी गावचे विकासपुरुष सरपंच कैलासबप्पा घुगे व युवा उद्योजक प्रदीपभैया मोराळे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. तर सर्व मित्रपरिवार, तरुण सहकारी, समाजबांधव, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार बंधू, जेष्ठ मंडळी, भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते व पदाधिकारी सहकार्य केले आहे.

रुई गावचा आढावा घेतला ❋

आ. अमित गोरखे यांनी अँड. मयूर आंधळे यांना पुनर्वसित रुई (पिंपळा) ग्रामपंचायत कडून आतापर्यंत झालेल्या विविध विकासकामे व योजना यांचा आढावा घेतला तसेच आतापर्यंत राबवलेले विविध समाजपयोगी उपक्रम व त्यांचे नियोजन यावर त्यांनी मयूर आंधळे यांचे जाहीर कौतुक केले.

संजय आंधळे यांचे अभिनंदन केले ❋

भारतीय जनता पार्टीच्या युवा मोर्चाच्या बीड जिल्हा अध्यक्षपदी नुकतीच युवा नेते संजय भाऊ आंधळे यांची निवड करण्यात आली आहे या निवडी संदर्भात विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे यांनी संजय आंधळे यांचे विशेष स्वागत केले व पुढील कार्यासाठी शुभेच्छा देखील दिली आहेत काम करत राहा काही गरज पडली तर नक्कीच मदत करेल अशा शब्दात अमित गोरखे यांनी संजय आंधळे यांचे अभिनंदन केले आहे.

### जिल्हास्तरीय लोकशाही दिनात तीन अर्ज प्राप्त

बीड । प्रतिनिधी

जिल्हास्तरीय लोकशाही दिनामध्ये ०३ तक्रार अर्ज प्राप्त झाले. निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगती सभागृहात लोकशाही दिन संपन्न झाला.

यावेळी उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) शैलेस सुर्यवंशी, तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी, जिल्हा पोलीस मुख्यालय, जिल्हा परिषद, पाटबंधारे विभाग सार्वजनिक बांधकाम विभाग, परिवहन विभाग, सहकार विभाग, कृषी विभाग व पाणी पुरवठा विभाग, समन्वय अधिकारी इत्यादी जिल्हा स्तरावरील प्रमुख अधिकारी व ज्या कार्यालयाकडून लोकशाही दिनातील प्रलंबित प्रकरणे होती, ते संबंधित अधिकारी उपस्थित होते. उपजिल्हाधिकारी यांच्याकडे महसूल संबधित एकूण तीन तक्रार अर्ज जिल्हा लोकशाही दिनात प्राप्त झाले असून निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी अर्जावर सुनावणी घेऊन संबधित विभागास १५ दिवसात संबधित प्रकरणे निकाली काढण्याच्या सूचना दिल्या आहेत.

## राष्ट्रीय क्रीडादिनी रोटरी क्लबने केला ग्राऊंडवर जाऊन खेळाडूंचा गौरव

**गेवराई । प्रतिनिधी**

भारताला ऑलिम्पिकमध्ये सलग सुवर्णपदक मिळवून देणाऱ्या हॉकी संघाचा कर्णधार मेजर ध्यानचंद यांच्या जन्मदिनी राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त रोटरी क्लब ऑफ गेवराईच्या संचालक व सदस्यांनी क्रीडांगणावर जाऊन राष्ट्रीय व राज्य खेळाडूंचा गौरव केला . यावेळी शेकडो विद्यार्थी खेळाडू मैदानावर उपस्थित होते २९ ऑगस्ट हा दिवस मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीदिनी संपूर्ण भारतात राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा केला जातो . त्यानिमित्त गेवराई रोटरी क्लब च्या संचालक व सदस्यांनी पाऊस सुरू असतानाही जगदंबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्रांगणात शारदा स्पोर्ट्स कॅडमीच्या मैदानावर सायंकाळी जाऊन कबड्डी, खो -खो , सॉफ्टबॉल, थॅलॅटिक्स व इतर खेळातील राष्ट्रीय व राज्य खेळाडूंचा सन्मान करण्यात



आला . सुरुवातीला हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले . .कबड्डीचे एनएसआय कोच डॉ . केतन गायकवाड,शुभम कादे ,राष्ट्रीय व राज्य खेळाडू बाळु आडे, गणेश यादव, ज्ञानेश्वर धापसे , भरत यादव , सॉफ्टबॉलचा गौतम बोरूडे, खो - खो चे तेजस्विनी जंगले, प्रतीक्षा येवले, ज्ञानेश्वरी काळम, ऋतुजा वाघमारे, अभिजीत हिवाळे, वेदांत काळे, सुशांत नलवडे, करण मोमीन, ऋतिक करे, निशांत तळवडे , विजय धुरंधरे आदी खेळाडूंचा यावेळी सन्मान करण्यात आला . याच कार्यक्रमात राष्ट्रीय खेळाडू व कोच डॉ . केतन गायकवाड, विजय जाहेर ( खो - खो ), प्रा .डॉ .रविंद्र खरात (थलेटिक्स ), सचिन मोहिते ( योगासन ) , विजय अपसिंगेकर (व्हॉलीबॉल ), मयूर मोटे (कबड्डी ) , प्रल्हाद जाधव आदी खेळाडूंचा सन्मान रोटरी क्लब ऑफ गेवराईचे अध्यक्ष प्रा . राजेंद्र बरकसे, सचिव प्रविण जैन, व्होकेशनल सव्हिस चेअरमन राजेंद्र डेंगे ,क्लब डमिनिस्ट्रेशन चेअरमन गणेश कुलकर्णी, रामदास शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला . यावेळी खेळाडूंना मार्गदर्शन करताना प्रा . राजेंद्र बरकसे यांनी खेळात करियरच्या संधी खूप आहेत . देश - विदेशात जाता येते, सांघिकता व एकतेची भावना वृद्धिंगत होते . यश - अपयश पचवायची ताकत निर्माण होते . बुद्धिमत्ता वाढीस लागते . त्यामुळे किमान सायंकाळी तरी पालकांनी मुलांना ग्राऊंडवर पाठवावे, असे प्रतिपादन त्यांनी केले . खेळाडूंशी संवाद साधताना मेजर ध्यानचंद यांच्या जीवनातील थरारक व रोमांचकारी अनुभव सांगून खेळामुळे राष्ट्र बळकट होते, असे मत क्लब प्रशासक गणेश कुलकर्णी यांनी मांडले . रोटरी क्लब ऑफ गेवराईचे सचिव प्रविण जैन यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## पाटोद्यात जरांगे पाटील यांच्या आंदोलनाच्या समर्थनार्थ कडकडीत बंद



पाटोदा । प्रतिनिधी

मराठा समाजाच्या आरक्षणासाठी मुंबईत जरांगे पाटील उपोषणासाठी बसले आहेत.लाखो समाज बांधव त्यांच्या समर्थनार्थ रस्त्यावर उतरले आहेत.तर तिकडे मुंबई जास्त गर्दी होत असल्याने काही मराठा बांधव स्थानिक पातळीवर मनोज जरांगे पाटील यांना पाठिंबा देत आहे आज दि.२ मंगळवार रोजी पाटोदा शहरात कडकडीत बंद पाळून पाठिंबा दिला आहे.या बंदला व्यापारी वर्गाने बंद करून पाठींबा दिला.या वेळी पाटोदा व परिसरातील मराठा बांधव छत्रपती शिवाजी महाराज चौकात एकत्र येऊन पाटोदा शहरातून मोटार सायकल रॅली काढली व छत्रपती शिवाजी महाराज चौकात समारोप केले. यावेळी अनेक समाज बांधवांनी आपल्या मनोगत व्यक्त करताना सांगितले की सरकारने लवकरात लवकर मराठा समाजाला न्याय द्यावा

असे सांगितले.यावेळी प्रथम नगराध्यक्षापती राजेंद्र जाधव, समाज सुधारक शेतकरी नेते गणेश कवडे, नगरपंचायत उपाध्यक्ष शरद बामदळे, माजी नगरसेवक संदीप जाधव, जितेंद्र भोसले, युवराज (आण्णा)जाधव, गणेश बामदळे सह शेकडो मराठा बांधव उपस्थित होते.यावेळी अनुसूचित प्रकार घडू नये म्हणून पाटोदा पोलीस विभागाने कडक बंदोबस्त केला होता.

cmyk

# 'गोकुळ'तर्फे म्हैस, गाय दूध खरेदी दरात एक रुपया वाढ'

कोल्पापूर: जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाने (गोकुळ) म्हैस व गाय दूध खरेदी दरात प्रतिलिटर एक रुपयाने वाढ करून सभासदांना गणेशोत्सवाची भेट दिली. ही दरवाढ सोमवारपासून लागू झाली आहे. याशिवाय संस्था इमारत अनुदानात आणि दूध संस्था कर्मचारी प्रोत्साहनातदेखील वाढ करण्यात आली आहे. विशेष म्हणजे मुक्त गोठा अनुदान योजनेसाठी पाचऐवजी चार जनावरांनाही लाभ देण्याचा निर्णय घेतल्याची माहिती अध्यक्ष नविद मुश्रीफ यांनी दिली.





मुश्रीफ म्हणाले, ''म्हैस दूध खरेदी दर ६.० फॅट व ९.० एस.एन.एफ.साठी प्रतिलिटर रुपये ५०.५० वरून ५१.५० रुपये करण्यात आला आहे. तसेच ६.५ फॅट व ९.० एस.एन.एफ.साठी प्रतिलिटर रुपये ५४.८० वरून रुपये ५५.८० करण्यात आला आहे. गाय दुधामध्ये ३.५ फॅट व ८.५ एस.एन.एफ.साठी प्रतिलिटर ३२ वरून ३३ रुपये केला आहे. या दर वाढीमुळे गोकुळच्या म्हैस व गाय दूध उत्पादकांना महिन्याकाठी सुमारे साडेचार ते पाच कोटींचा जादा परतावा मिळणार आहे.'' ते म्हणाले, की सध्या इमारत बांधकामासाठी लागणारे साहित्य दर आणि मजुरांचे पगार वाढलेले आहेत. त्यामुळे दूध संस्थेच्या संकलनानुसार अनुदान रकमेत ८ ते १० हजार रुपयांची वाढ केली आहे. याबरोबरच संस्था कर्मचाऱ्यांच्या पगारासाठी प्रोत्साहनपर जादा दर प्रतिलिटर पाच पैशांची वाढ केली आहे. ती प्रतिलिटर ०.६५ पैसेऐवजी ०.७० पैसे अशी असेल. याचा सुमारे तीन कोटी रुपये वार्षिक आर्थिक भार संघावर पडणार आहे. मुक्त गोठा अनुदान योजनेत यापूर्वी किमान पाच जनावरांपर्यंत असणाऱ्या गोठ्यांनाच अनुदान दिले जात होते. आता चार जनावरे असलेल्या मुक्त गोठ्यालही अनुदान दिले जाणार आहे.

## ऑक्टोबर महिन्यात या पद्धतीने करा 'चारा बीट' पिकाची लागवड

शेतकरी बंधुंनो कोरडवाहू भागासाठी 'चारा बीट' हे उच्च उत्पादन आणि जनावरांना उर्जा देणारे चारा पीक विकसित करण्यात आलेले आहे. निकृष्ट माती आणि पाणी असलेल्या भागात सुद्धा या चारा पिकाची लागवड करता येत असल्यामुळे पशुपालक शेतकऱ्यांसाठी हे पीक नक्कीच फायद्याचे ठरणारे आहे.

माती आणि हवामान : या चारा पिकाला मध्यम तापमान आवश्यक आहे, ज्यामुळे ते अर्ध-शुष्क प्रदेशात लागवडीसाठी योग्य बनते. खराब-गुणवत्तेच्या मातीत आणि पाण्यातही हे पीक चांगले येते. पेरणीची वेळ : चारा बीटची पेरणी प्रामुख्याने ऑक्टोबरच्या मध्यापासून ते नोव्हेंबरच्या मध्यापर्यंत केली जाते. लवकर पेरणी केल्याने मुळांचा योग्य विकास होतो आणि जास्तीत जास्त उत्पादन मिळते. जमीन तयार करणे : पेरणीपूर्वी ३ ते ४ आठवडे नांगरणी करावी. बियाणे पेरणीसाठी चांगले वाफे तयार करून २० सेमी उंच गादी वाफ्यावर बियाणे पेरणी करावी.



बियाणे प्रमाण आणि लागवड अंतर : चारा बीटसाठी २.० ते २.५ किलो बियाणे प्रति हेक्टर वापरावे. बियाणे २ ते ४ सें. मी. खोलीवर पेरावे आणि रोपामध्ये २० सेमी अंतर ठेवावे. खत व्यवस्थापन : सुमारे २५ टन शेणखत/हेक्टर, १०० किलो नत्र/हेक्टर + ७५ किलो स्फुरद/हेक्टर माती चारा बीट लागवडीसाठी शिफारस करण्यात येते. नत्र तीन भागात विभागून द्यावे अर्धे पेरणीच्या वेळी आणि २५% नत्र लागवडीनंतर ३० आणि ५० दिवसांनी द्यावे. सिंचन पद्धती : चारा बीटला १०-१२ तुषार सिंचन आवश्यक आहे आणि एकूण ८०-१०० सेमी सिंचन पाण्याची आवश्यकता आहे. चारा बीट पिकाला ७ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. आंतरमशागत : पेरणीनंतर २०-३० दिवसांच्या दरम्यान विरळणी, तण काढणे आणि मातीची भर देणे यासारखी आंतर मशागतीची कामे करावीत. कीड आणि रोग व्यवस्थापन : जमिनीतून होणार्या किडीच्या नियंत्रणासाठी, पेरणीपूर्वी क्विनॅलफॉस पावडर (१.५) २५ किलो/हेक्टरी याप्रमाणात जमिनीत मिसळावे. पानांचा मर रोग टाळण्यासाठी वेळोवेळी पिकाला पाणी द्यावे. कापणी : कापणी साधारणपणे जानेवारीच्या मध्यात सुरू होते, एकदा मुळे १.० ते १.५ किलो वजनापर्यंत पोहोचतात. मुळे आणि पाने दोन्ही अत्यंत पौष्टिक आहेत आणि पशुधनासाठी उत्कृष्ट खाद्य सिद्ध झाले आहे. जनावरांना चारा बीट देण्याचे प्रमाण आणि पद्धती : जनावरांच्या चाऱ्यासाठी चिरलेली मुळे कोरड्या चाऱ्यामध्ये मिसळली जातात. या मुळ्यांचे प्रमाण हळूहळू वाढवत जनावरांच्या एकूण कोरड्या पदार्थाच्या ६०% भाग करावे. गायी आणि म्हशींसाठी १२ ते २० किलो प्रतिदिन आणि लहान पशुंसाठी ४ ते ६ किलो प्रतिदिन शिफारस केलेले डोस आहेत. तीन दिवसांपेक्षा जास्त काळ कापणी केलेला किंवा जास्त प्रमाणात चारा देणे टाळावे कारण त्यामुळे जनावरांना आम्लपित्त होऊ शकते.

## ऊस पिकातील गवताळ वाढ रोखण्यासाठी सोपे उपाय

गवताळ वाढ हा रोग उसामधील वाढीच्या वेगवेगळ्या अवस्थेमध्ये महत्त्वाची लक्षणे दर्शवितो. रोगग्रस्त उसाची प्राथमिक लक्षणे लावणीनंतर अथवा खोडव्यातील उगवून आलेल्या उसाच्या पानांवर दिसून येतात. गवताळ वाढ हा रोग उसामधील वाढीच्या वेगवेगळ्या अवस्थेमध्ये महत्त्वाची लक्षणे दर्शवितो. रोगग्रस्त उसाची प्राथमिक लक्षणे लावणीनंतर अथवा खोडव्यातील उगवून आलेल्या उसाच्या पानांवर दिसून येतात. को ४१९, को ७४०, को ७५२७, कोसी ६७१, को ९४०१२ व को ८६०३२ या जातीत या रोगाचे प्रमाण जास्त आढळते. महाराष्ट्रात या रोगाचे प्रमाण १०% पर्यंत आहे. या रोगाचा प्रसार बेण्यामार्फत व किडीद्वारे होतो.

रोगाची लक्षणे : रोगामुळे पिकाच्या सुरूवातीच्या काळात ऊस बेटात प्रमाणापेक्षा जास्त फुटवे दिसतात व बेटास गवताच्या ठोंबाचे स्वरूप येते. बेटांत फुटल्यांची संख्या कधी-कधी १०० पेक्षा जास्त आढळते. रोगामुळे उसाच्या पानामध्ये कमी प्रमाणात हरितद्रव्य तयार होते त्यामुळे पाने पिवळी किंवा पांढरी पडतात. रोगट बेटात गाळण्यालायक ऊस तयार होत नाही. रोगट उसावरील पाने अरुंद व आखूड होतात. पूर्व वाढ झालेल्या रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास, पोंग्यातील पाने पिवळी पडतात व कांड्यावरील डोळ्यातून पिवळसर पांगशा फुटतात. रोगट ऊस नंतर पोकळ होऊन वाळतो. गवताळ वाढ रोगामुळे ५ ते २० % पर्यंत ऊस उत्पादनात घट येते. खोडवा पिकात ह्या रोगामुळे जास्त प्रमाणात बेटे पिवळी पडतात व मरतात. रोगाचे प्रमाणदेखील सुरुवातीच्या काळात जास्त आढळते. रोगग्रस्त खोडवा पिकातील उसांची संख्या घटते.

रोग नियंत्रणाचे उपाय : बेणे मळ्यातील रोगमुक्त बेणे लागवडीसाठी निवडावे. बेणे मळ्यासाठी मुलभूत बेणे तयार करण्यासाठी लागवडीपूर्वी ऊस बेण्यास बाष्प-हवा प्रक्रिया यंत्राद्वारे ५४ सेंटिग्रेट तापमानास १५० मिनीटे प्रक्रिया करावी. उसाची उगवण झाल्यानंतर नियमितपणे प्रादुर्भावग्रस्थ बेणे मुळासहीत काढावीत व जाळून नष्ट करावीत. पिकाची पाहणी करून रोगट बेटे काढावीत. सामुहिक पद्धतीने बेटे निर्मुलनाचा कार्यक्रम हाती घेतल्यास रोगाचे नियंत्रण प्रभावीपणे करता येईल. बेणे छाटते वेळी कोयता अधून मधून उकळत्या पाण्यात निर्जंतुक करावा. उसावरील रस शोषण करणाऱ्या किडींचा बंदोबस्त वेळीच करावा, जेणेकरून रोगाचा प्रसार होणार नाही. रोगाचे प्रमाण २०% पेक्षा जास्त असल्यास त्या पिकाचा खोडवा घेवू नये. पिकाची फेरपालट करावी जेणेकरून रोगाचे प्रमाण पुढील पिकात कमी राहील.



## रब्बी सूर्यफूल लागवड तंत्रज्ञान

दिवसेंदिवस खाद्यतेलाची मागणी वाढत आहे. जागतिक पातळीवर सोयाबीन, मोहरी, भुईमूग या पिकानंतर सूर्यफूल हे चौथ्या क्रमांकाचे तेलबिया पिक आहे. या पिकाची लागवड खरीप तसेच रब्बी हंगमातही केली जाते. कर्नाटक, महाराष्ट्र आणि आंध्र प्रदेश ही प्रमुख सूर्यफूल उत्पादक राज्ये आहेत. महाराष्ट्रातील बरेच शेतकरी या पिकाच्या लागवडीकडे वळत आहेत. सूर्यफूल पिकाच्या लागवडीची महिती आपण जाणून घेऊया.

पूर्वमशागत व लागवडीचा हंगाम : पेरणीआधी जमिनीची खोल नांगरट करून कुळवाच्या आडव्या-उभ्या पाळ्या द्याव्यात. कोरडवाहू सूर्यफुलाची पेरणी दोन चाड्याच्या पाभरीने करावी. बियाणे ५ सें.मी. पेक्षा जास्त खोल पेरू नये. बागायती सूर्यफुलाची लागवड सरी-वरंब्यावर टोकन पद्धतीने करावी. मध्यम ते खोल जमिनीत अंतर ४५ ३० सें.मी. तर भारी जमिनीत ६० बाय ३० सें.मी. ठेवावे. रब्बी हंगामात कोरडवाहू सूर्यफुलाची पेरणी १५ ऑक्टोबर पूर्वी करावी.

तसेच बागायती सूर्यफुलाची पेरणी नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यापर्यंत करावी. सूर्यफूल लागवडीसाठी पाण्याचा चांगला निचरा होणारी जमीन निवडावी. आम्लयुक्त व पाणथळ जमिनीत हे पीक घेऊ नये.



बीजप्रक्रिया व पिकाचे वाण : पेरणीसाठी सुधारित बियाणांचे वाण ८ ते १० कि.ग्रॅ. तर संकरित बियाणे ५ ते ६ कि.ग्रॅ. प्रति हेक्टरी वापरावे. मर रोगाच्या प्रतिबंधासाठी प्रतिकिलो बियाणास २ ते २.५ ग्रॅम थायरमची बीजप्रक्रिया करावी.

सुधारीत वाण : एस.एस. ५६, मॉडर्न, भानू, के.बी.एस.एच. १, एल.एस.एच-३५, एल.एस.एफ.एच १७१,

खत व्यवस्थापन : जमिनीची पूर्वमशागत करताना लागवडीपूर्वी प्रतिहेक्टरी २.५ टन शेणखत टाकावे. कोरडवाहू पिकासाठी माती परीक्षणानुसार हेक्टरी ५० किलो नत्र, २५ किलो स्फुरद व २५ किलो पालाश हे खत वेळी दोन चाड्याच्या पाभरीने पेरणीच्या वेळी द्यावे. बागायती पिकासाठी ६० किलो नत्र, ३० किलो स्फुरद, ३० किलो पालाश द्यावे. यापैकी पेरणीच्या वेळी ३० किलो द्यावे. व पेरणीनंतर १ महिन्याने उर्वरित ३० किलो नत्र द्यावे.

मशागत व पाणी व्यवस्थापन : पेरणीनंतर १५ दिवसांनी सूर्यफुलाची विरळणी करावी. दोन रोपांतील अंतर ३० सें.मी. ठेवावे. आवश्यकतेनुसार एक ते दोन खुरपण्या कराव्या. पेरणीनंतर २० ते २५ दिवसांनी एक आणि ३५ ते ४० दिवसांनी एक अशा दोन कोळपण्या कराव्यात. पिकाची रोपावस्था, फुलकळी, फुलोरा व दाणे भरताना अशा वाढीच्या अवस्थांमध्ये पिकाला पाणी द्यावे.

कृत्रिम परागीभवन : पिकामध्ये दाणे भरण्यासाठी फुलाचे परागीभवन होणे आवश्यक असते. कृत्रिम परागीभवन करण्यासाठी हाताच्या पंजाला तलम कापड गुंडाळून सकाळी ६ ते ११ या वेळेत दर दिवसाआड तीन ते चार वेळा पिकावरून हळूवार हात फिरवावा. मधमाश्यांच्या चार ते पाच पेट्या एक हेक्टर पिकात ठेवाव्यात.




### महत्वाच्या घटना

३०१: ३०१ई.पूर्व : जगातील सर्वात जुने प्रजासत्ताक राष्ट्र सॅन मरीनो स्थापित झाले.
१७५२ : अमेरिकेत ग्रेगरीयन कॅलेंडरचा वापर सुरू झाला.
१९१६ : श्रीमती ॲनी बेझंट यांनी 'होमरुल लीग'ची स्थापना केली.
१९२१: बेल्जियम देशांत कम्युनिस्ट पक्षाची स्थापना करण्यात आली.
१९३५ : सर मॅल्कम कॅम्पबेल ताशी ३०० मैल पेक्षा जास्त जोरात ऑटोमोबाईल चालवणारे पहिले व्यक्ति झाले.
१९३९ : जर्मन सम्राट हिटलर यांच्या पोलंड, ब्रिटन आणि फ्रान्सवर केलेल्या हल्ल्याला प्रती उत्तर म्हणून, सत्ता गाजविलेल्या राष्ट्राच्या दोन्ही मित्रपक्षांनी जर्मनीविरुद्ध युद्धाची घोषणा केली.
१९७१ : कतारला स्वातंत्र्य मिळाले.
२००४ : भारतीय पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी आणि पाकचे अध्यक्ष परवेझ मुशर्रफ यांच्यात या वर्षाच्या सुरुवातीच्या काळात नाजूक शांतता वाढत असताना, भारत आणि पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्र्यांनी दिल्ली येथे बैठक घेऊन शांततेचा करार केला.
२०१८ : उपराष्ट्रपती व्यंकय्या नायडू यांनी लिहिलेल्या ''मुव्हिंग ऑन मुव्हिंग फोरवर्ड : ए इयर इन ऑफिस'' या पुस्तकाचे पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.
२०१९ : भारतातील मध्य प्रदेश राज्यातील भोपाळ या शहरात सुरु असलेल्या राष्ट्रीय स्पर्धांमध्ये वरिष्ठ राष्ट्रीय जलतरण स्पर्धेत ५० मीटर बटरफ्लाय प्रकारात वीर धवल खाडे व दिव्या सतीजा यांनी राष्ट्रीय विक्रमासह सुवर्णपदक पटकावले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६१७ : मुघल सम्राट शाहजहां आणि त्यांची पत्नी मुमताज महल यांची दुसरी मुलगी रोशनारा बेगम यांचा जन्मदिन.
१८५५ : पंत महाराज बाळेकुन्द्री आध्यात्मिक गुरू (मृत्यू: १६ आक्टोबर १९०५)
१८७५ : फर्डिनांड पोर्श ऑस्ट्रियन वाहन अभियंता (मृत्यू: ३० जानेवारी १९५१)
१९०५ : नोबेल पारितोषिक विजेते अमेरिकन रसायनशास्त्रज्ञ कार्ल डेव्हिड अँडरसनयांचा जन्म.
१९०५ : भारतीय राजकारणी, लेखक, पत्रकार आणि स्वातंत्र्यसैनिक कमलापती त्रिपाठी यांचा जन्मदिन.
१९२३ : कृष्णराव तथा 'शाहीर' साबळे संगीत नाटक अकादमी तसचं पद्मश्री पुरस्कार सन्मानित महाराष्ट्रीयन मराठी शाहीर. 'महाराष्ट्राची लोकधारा' या आपल्या कार्यक्रमातून लावणी, कोकेवाला (ग्रामीण भागात सारंगीसारखे वाद्य वाजवून देवादिकांची आख्याने गाणारा), बाल्यानृत्य (मुंबईत उपाहारगृहांत, धनिकांकडे, तसेच चाळींतील लोकांकडे कामाला असलेल्या कोकणी गड्यांचेबाल्यांचेनृत्य), कोळीनृत्य, गोंधळीनृत्य, मंगळागौर, वाघ्यामुरळी, वासुदेव, धनगर इत्यादींचे जिवंत दर्शन ते घडवत असत. या कार्यक्रमाला अफाट लोकप्रियता मिळाली होती (मृत्यू: २० मार्च २०१५)
१९२३ : टाको बेल चे संस्थापक ग्लेन बेल यांचा जन्म. (मृत्यू: १६ जानेवारी २०१२)
१९२६ : भारतीय बंगाली व हिंदी चित्रपट अभिनेते उत्तम कुमार यांचा जन्मदिन.
१९२७ : अरुण कुमार चटर्जी तथा 'उत्तम कुमार' बंगाली व हिन्दी चित्रपट अभिनेते (मृत्यू: २४ जुलै १९८०)
१९३१ : श्याम फडके नाटककार ('काका किशाचा', 'तीन चोक तेरा', 'राजा नावाचा गुलाम' फेम)
१९३८ : नोबेल पारितोषिक विजेते जपानी रसायनशास्त्रज्ञ रायोजी नोयोरी यांचा जन्म.
१९४० : प्यारेलाल रामप्रसाद शर्मा चित्रपटसृष्टीत चार दशके लोकप्रिय संगीत देणार्या 'लक्ष्मीकांत-प्यारेलाल' या जोडीतील संगीतकार
१९५६ : भारतीय अभिनेते आणि दिग्दर्शक जिझु दासगुप्ता यांचा जन्म. (मृत्यू: २१ डिसेंबर २०१२)
१९५७ : भारतीय योग गुरु व सद्गुरू नावाने प्रख्यात ईशा फाउंडेशनचे संस्थापकजग्गी वासुदेव यांचा जन्मदिन.
१९६५ : अमेरिकन अभिनेता चार्ली शीन यांचा जन्म.
१९७१ : भारतीय-अमेरिकन लेखक किरण देसाई यांचा जन्म.
१९७४ : भारतीय क्रिकेटपटू राहुल संघवी यांचा जन्म.
१९७६ : विवेक ओबेरॉय अभिनेता
१९९२ : राजीव गांधी खेलरत्न पुरस्कार व पद्मश्री पुरस्कार सन्मानित भारतीय कुस्तीपटू महिला साक्षी मलिक यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९५३ : लक्ष्मण तथा 'खाप्रुमामा' पर्वतकर तबला, घुमट व सारंगीवादक. गोव्यातील 'घुमट' हे तालवाद्य ते अत्यंत कौशल्याने वाजवत. त्यांनी लयकारीमध्ये विविध, नावीन्यपूर्ण व आश्चर्यजनक प्रयोग केले आणि तालाच्या जाणकारांमध्ये लौकिक संपादन केला. दिलेल्या मूळच्या लयीत कोणतीही पट ते लीलया करीत असत. त्याचप्रमाणे ते एकाच वेळी एका पायाने त्रिताल, दुसऱ्या पायाने झपताल, एका हाताने लय, दुसऱ्या हाताने चौताल धरून तोंडाने सवारीचा ठेका म्हणत असत. तोंडाने विशिष्ट बोलांची तीन आवर्तने करत असतानाच ते त्याच वेळी तबल्यावर पाच वेळा तोच बोल वाजवून दोन्हींची सम अचूक साधत असत आणि हे करताना लयीची यत्किंचितही ओढाताण झालेली दिसून येत नसे. एखादी परण तोंडातून उलटी म्हणत असतानाच तबल्यावर सुलटी वाजवून ते समेवर बरोबर येत. त्यांनी पावणेसोळा मात्रांचा 'परब्रह्म' ताल रचून त्यात पाव मात्रेचे १२५ 'धा' असलेली 'महासुदर्शन' नामक परण बांधली. या त्यांच्या अद्भुत व अद्वितीय लयसिद्धीमुळेच त्यांना ख्यातनाम गायक अल्लादियाखाँ यांनी 'लयब्रह्मभास्कर' ही पदवी देऊन त्यांचा यथोचित गौरव केला. (जन्म: १८८०)
१९५८ : माधव केशव काटदरे निसर्गकवी (जन्म: ३ डिसेंबर १८९२)
१९६७ : अनंत हरी गद्रे तथा समतानंद वार्ताहर, संपादक, थोर समाजसुधारक आणि नाटिका संप्रदायाचे प्रवर्तक, जाहिरातशास्त्रातील तज्ज्ञ. 'मौज' आणि 'निर्भिड' ही साप्ताहिके त्यांनी सुरू केली. जातीयता निर्मूलनासाठी त्यांनी सहभोजनाचा (त्या काळातील धाडसी) उपक्रम चालवला. (जन्म: १६ आक्टोबर १८९०)
१९९१ : अमेरिकन चित्रपट दिग्दर्शक फ्रँक काप्रा यांचे निधन.
२००० : पांडुरंग पुरुषोत्तम शिरोडकर स्वातंत्र्यसैनिक, गोवा विधानसभेचे पहिले सभापती
२०१४ : भारतीय राजकारणी ए. पी. वेंकटेश्वरन यांचे निधन. (जन्म: २ ऑगस्ट १९३०)



राज्य लोकतंत्र
# अहिल्यानगर/जालना
बुधवार दि.३ सप्टेंबर २०२५ ५



# कापसाच्या हंगामात आयात माफीचा धोका

## शेतकरी संघटना आक्रमक, आज जाळणार अधिसूचनेच्या प्रती

नेवासा। प्रतिनिधी

नेवासा कापसावरील आयात शुल्कमाफी अधिसूचनेची प्रती जाळण्यासाठी अखिल भारतीय किसान सभेच्यावतीने बुधवारी (दि.३) दुपारी १२ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने हजर रहावे, असे आवाहन किसान सभेचे जिल्हाध्यक्ष कॉ.बबनराव सालके आणि जिल्हा सचिव कॉ.अप्पासाहेब वाबळे यांनी केले आहे.

कांदा निर्यात संकटाच्या नावाखाली मोदी सरकारच्या आडून व्यापारी मक्तेदारी आणि औद्योगिक मक्तेदार कापूस उत्पादक शेतकऱ्यांची लूट करत असूनकापसाच्या पट्ट्यातील शेतकरी याला जोरदार विरोध करत आहे. असे असताना सुद्धा अर्थमंत्रालयाने ३१ डिसेंबरपर्यंत शुल्क माफी वाढवलेली आहे. मोदी सरकारच्या अधिनस्थ असलेली नोकरशाही भांडवलदारांना फायदा देत शेतकऱ्यांवर अन्याय करत असल्याचेही कॉ.सालके आणि वाबळे यांनी सांगितले आहे. ३१ डिसेंबरपर्यंतच्या आयात शुल्क माफीचा



निर्णय कालावधी कापूस शेतकऱ्यांसाठी अधिक हानिकारक ठरणार असेल. कारण ऑक्टोबर २०२५ पर्यंत कापूस वेचणीचा हंगाम सुरू होईल. बेलगाम आयात शुल्क मुक्त कापूस आयात हे प्रामुख्याने देशांतर्गत किंमती दाबण्यासाठीचा व शेतकऱ्यांना योग्य मूल्य मिळू नये म्हणून एक हा सरकारचा कुटील डाव असल्याची टीका केली. गेल्या ११ वर्षांमध्ये सीआयसी-कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया देशांतर्गत उत्पादनाच्या १३ टक्केपेक्षा कमी खरेदी करत आहे आणि शेतकऱ्यांना ८७ टक्के कच्चा कापूस संकटकालीन किंमतीत खुल्या बाजारात विकण्यास भाग पाडले गेले आहे.संयुक्त किसान मोर्चा ही कृती संपुर्ण शेतकरी समुदायाचा केलेला अपमान असल्याचे समजत असून, दि.१ ते ३ सप्टेंबर रोजी देशभरातील गावांमध्ये अधिसूचनेची प्रती जाळण्यासाठी होणाऱ्या निदर्शनात सर्व शेतकऱ्यांना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

तसेच या शेतकऱ्यांनी भारत सरकारला हे स्पष्ट केले नाही की, अशा शेतकरी विरोधी निर्णयांना मान्यता दिली जाणार नाही तर मोदी सरकार अमेरिकेच्या दबावाखाली येऊन इतर पिकांसाठी देखील असे निर्णय घेऊ शकते. त्यामुळे संयुक्त किसान मोर्चा सर्व शेतकऱ्यांना एकत्र आणण्याचे आणि सरकारने घेतलेला हा निर्णय मागे घेण्यास भाग पाडण्यासाठी तीव्र आंदोलन सुरू करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

गेली तीन हंगाम कापसाला हमीभावापेक्षा ३००० ते ४००० रुपये कमी दर मिळत आहे. त्यामळे शेतकरी मेटाकुटीला आलेला आहे. केंद्र सरकारने कापड क्षेत्राच्या प्रोत्साहनाच्या नावाखाली कापड उद्योग आणि व्यापारातील मक्तेदार कॉर्पोरेट कंपन्यांसाठी स्वस्त आयातीला परवानगी देण्यात येवू नये कारण त्यामुळे कापूस शेतकरी उद्?ध्वस्त होत आहे. कापसावरील आयात शुल्क हटवू नये व कापूस आयात करू नये, अशी मागणी यावेळी बोलतांना त्यांनी केली आहे. या आंदोलनात शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन कॉ.बन्सी सातपुते, प्रा.सुभाष ठुबे, कॉ.लक्ष्मण नवले, बापूराव राशिनकर, ,सुरेश पानसरे सुनिल दुधाडे, भारत अरगडे, बाबासाहेब सोनपुरे, बबनराव पवार, प्रताप सहाणे, सुधीर टोकेकर, संदीप इथापे, गोरक्षनाथ मोरे,पांडुरंग शिंदे, सुलाबाई आदमने, लता मेंगाळ व रमेश नागवडे आदींनी केली आहे.

# बारडगाव सुद्रिक,भांबोरा, कानगुडवाडी ग्रामस्थांचा शिदोरीसाठी पुढाकार



जामखेड। प्रतिनिधी

मराठा आरक्षणासाठी मुंबईतील आझाद मैदानावर मनोज जरांगे यांनी गेल्या चार दिवसांपासून सुरू केलेल्या आंदोलनात राज्यभरातून मोठ्या संख्येने मराठा आंदोलक सहभागी होत आहेत. या पार्श्वभूमीवर आंदोलकांची उपासमार होऊ नये, यासाठी बारडगाव सुद्रिक, भांबोरा, कानगुडवाडी येथील मराठा भगिनी व बांधवांनी भाकरी, चटणी, लोणचे, पाण्याच्या बाटल्या, बिस्किटांचे पुड्यांची शिदोरी पाठवण्यासाठी पुढाकार घेतला आहे.

बारडगाव सुद्रिक, भांबोरा, कानगुडवाडी येथील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी ग्रामस्थांना आवाहन करताच घरा-घरातून भाकरी, चटण्या, लोणचे, पाण्याच्या बाटल्यांचे बॉक्स अशी शिदोरी जमा झाली. हजारो भाकरी आणि सोबतच्या साहित्याची ग्रामस्थांनी बांधणी करून ही मदत चारचाकी वाहनाद्वारे मुंबईत आंदोलनस्थळी पोचवण्यासाठी रवाना करण्यात आली. एका आवाहनावर हजारोंच्या संख्येत आलेल्या ज्वारी आणि बाजरीच्या भाकरी, हिरव्या मिरचीचा ठेचा, लसूण चटणी आणि कैरीचे लोणचे यांची व्यवस्थित पॅकिंग मराठा समाजातील कार्यकर्त्यांनी केली. आंदोलन सुरू असे पर्यंत ही शिदोरी पाठवण्याचा निर्धार ग्रामस्थांनी केला आहे.

# स्मार्ट टीओडी आणि सोलर नेट मीटर ग्राहकांसाठी मोफत; पैसे मागितल्यास तक्रार करण्याचे आवाहन

अहिल्यानगर। प्रतिनिधी

स्मार्ट मीटर असलेल्या घरगुती ग्राहकांना टीओडीप्रमाणे वीजदरात सवलत मिळत असून महावितरणकडून एजन्सीच्या माध्यमातून हे स्मार्ट टीओडी मीटर ग्राहकांकडे मोफत लावण्यात येत आहेत.

सोबतच रूफ टॉप सोलर उभारणार्या ग्राहकांना आवश्यक असणारे नेट मीटरसुद्धा मोफत लावण्यात येत आहेत. मीटरसाठी कुठल्याही शुल्काची मागणी केल्यास तक्रार करावी, असे आवाहन महावितरणने केले आहे. महावितरणकडून स्मार्ट टीओडी मीटर ग्राहकांकडे मोफत लावण्यात येत आहे. त्यामुळे या नव्या मीटरचा कोणताही आर्थिक भुर्दंड ग्राहकांवर नाही. घरगुती ग्राहकांकडे टीओडी मीटर असल्याशिवाय त्यांना दिवसाच्या वीजदरात असलेल्या सवलतीचा लाभ घेता येणार नाही.

त्यामुळे सदर टीओडी मीटर आणि रूफ टॉप सोलर उभारणार्या ग्राहकांना आवश्यक असणार्या नेट मीटर लावण्यासाठी कुणाकडूनही शुल्काची मागणी झाल्यास देऊ नये. यासंदर्भात ग्राहकांनी नजीकच्या महावितरण कार्यालयात संपर्क साधावा अथवा तक्रार करावी असे आवाहन महावितरणने केले आहे.

# ईद ए मिलाद निमित्त बालेपीर परिसरात शुक्रवारी रक्तदान शिबिराचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

ईद ए मिलादउन नबी निमित्त बीड जिल्हा कॉंग्रेस कमिटी, बीड जिल्हा निराधार विभाग, व सोनू फॅन्स ग्रुप बीड, समाजसेवक गणेश जवकर व बालेपीर मित्र मंडळ यांच्या वतीने भव्य रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले असल्याचे आयोजकांनी कळवले आहे.या विषयी अधिक माहिती अशी कीईद ए मिलादउननबी निमित्त बीड जिल्हा कॉंग्रेस कमिटी निराधार निराश्रित विभाग, सोनू फॅन्स ग्रूप बीड व बालेपीर मित्र मंडळ च्या वतीने दि .५ सप्टेंबर रोजी शुक्रवार कालिंका नगर समोर कांग्रेस जनसंपर्क कार्यालय अ.नगर रोड बालेपीर ,बीड येथे सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असून रक्त दात्यांनी या शिबिरास उपस्थित राहण्याचे आवाहन राष्ट्रीय कांग्रेस बीड जिल्हा अध्यक्ष निराधार निराश्रित विभाग शेख मोहसीन बुऱ्हानोद्दीन , सोनू फॅन्स ग्रूप चे अध्यक्ष सोनू सेठ बीड,समाजसेवक गणेश जवकर, तालुका अध्यक्ष निराधार विभाग शेख झहीर अमीर , जमील खान सत्तार खान कार्याध्यक्ष व बालेपीर मित्र मंडळ यांनी केले आहे.

# लिंबागणेशमध्ये मयुरेश्वराचे राजेशाही थाटात विसर्जन

## गौरी बरोबरच गणेशाचे विसर्जन त्यामुळे गणेशोत्सव ५ दिवसांचा

लिंबागणेश

सुप्रसिद्ध श्रीक्षेत्र भालचंद्र गणपती तिर्थक्षेत्र असलेल्या बीड तालुक्यातील लिंबागणेश गावात ''एक गाव - एक गणपती'' ची २२५ वर्षांपासून परंपरा आहे. सरकार वाड्यात प्रतिष्ठापित मयुरेश्वर गणेशाची आज ता.२ मंगळवार रोजी आज दुपारी बारा वाजता मुख्य आरती केल्यानंतर छत्री,चौरी,अब्दगिरी,चामर,ध्वज,दंड अशा राजेशाही थाटात सरकार वाड्यातुन मयुरेश्वराची पालखीतुन विसर्जन मिरवणूक सुरू झाली. सरकार वाड्याच्या बाहेर आल्यानंतर बॅण्ड पथक, टाळ मृदंगाच्या गजरात भजनी मंडळींनी ठेका धरत तसेच ढोल ताशाच्या गजरात लेझीम पथकातील तरूणांनी आपले कसब दाखवले.मिरवणुकीसमोर परीट समाजातील बांधव धोतराच्या पायघड्या घालतात.''मोरया हो मोरया जय गजानन मोरया ''चा जयघोष आसमंतात दुमदमला. मिरवणुकीत परीसरातील १२ गावातील लेझीम पथकांनी मिरवणुकीत सहभाग घेतला. रात्री ९ वाजता भालचंद्र गणपती मंदिराच्या चंद्र पुष्करणी तिर्थात महाआरतीनंतर विसर्जन करण्यात येते.



मयुरेश्वराच्या विसर्जन मिरवणुकीत पालखी समोर धोतराच्या पायघड्या अंथरूण स्वागत करण्याचा मान परीट समाज बांधवांचा असतो तर गावातील मारोती मंदिराला प्रदक्षिणा घातल्यानंतर भाविकांना दर्शनासाठी कैकाडवाड्यात सजवलेल्या बैलगाडीत मयुरेश्वराची मुर्ती पंचक्रोशीतील भक्तांच्या दर्शनासाठी ठेवण्यात येते. हा मान कैकाडी समाज बांधवांचा असतो. गणेशचतुर्थीला षोडशोपचार पुजा करून सरकार वाड्यात मयुरेश्वर गणेशाची प्रतिष्ठापना केली जाते.वंशपरंपरेने उमेश कानिटकर ही गोजिरी मुर्ती तयार करतात.नागपंचमीच्या दुसऱ्या दिवशी मुर्तिकाम सुरू होऊन श्रावण वैद्य त्रयोदशीला पुर्ण होते.पोळ्याच्या दुसऱ्या दिवसापासून रंगकाम सुरू होते. मयुरेश्वराच्या मुर्तीसाठी चिखलाचे गोळे पुरवण्याचा परंपरागत मान मुळुक गावचे महादेव आहेरकर यांचा आहे. मागील २२५ वर्षांपासून लिंबागणेश गावाने ''एक गाव - एक गणपती'' परंपरा जपली आहे.गौरीबरोबरच गणेशाचे विसर्जन करण्याची इथे परंपरा असल्याने येथील गणेशोत्सव ५ दिवसांचा असतो. गावात दुसरीकडे सार्वजनिक गणपती बसवला जात नाही हे या गावचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर नेकनुर ठाण्याचे प्रभारी पोलिस निरीक्षक चंद्रकांत गोसावी, पोलिस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे,लक्ष्मण आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार बाबासाहेब राख, गोविंद बडे, ,पोह.क्षीरसागर,घुंगरट, ढाकणे,खाडे यांच्यासह एकुण ३० पोलिस कर्मचारी व होमगार्ड यांचा बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# जिल्हाधिकारी मित्तल यांच्या संकल्पनेतून ध्यानसाधनेला सुरुवात

जालना । प्रतिनिधी

जागतिक आरोग्य संघटनेने मानसिक स्वास्थासाठी ध्यानधारणा प्रभावी ठरते हे मान्य केलेले आहे. ध्यानसाधना केल्याने मन शांत होते, वैचारिक पातळीमध्ये वाढ होते व शारिरीक आरोग्य सुधारते, तसेच कामकाजातील कार्यक्षमता सुधारते. त्यामुळे जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या संकल्पनेतून अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी आता नियमित ध्यानसाधना हा कार्यक्रम आयोजित करण्याच्या निर्णय घेतला आहे. तरी सोमवार दि.१ सप्टेंबर २०२५ रोजी तहसीलदार तथा प्रशिक्षक प्रणाली तायडे यांच्या मार्गदर्शनात जिल्हाधिकारी



कार्यालयातील महसूल भवनामध्ये सकाळी १० ते १०.२० या वेळेत ध्यान साधना कार्यक्रम पार पडला.

सद्यस्थितीत दैनंदिन जीवनातील व्यस्तता व तणावपूर्ण जीवनशैली हा प्रत्येकाच्या आयुष्याचा एक भाग झालेला आहे. ज्याचा नकळतपणे आपल्या आरोग्य व मानसिकतेवर विपरित परिणाम होत आहे. आरोग्य हीच आपली खरी संपत्ती हा दृष्टीकोन नजरेसमोर ठेवून सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या आरोग्याचे हित साधण्यासाठी जीवनमानात ध्यान साधनेला अत्यंत महत्वाचे स्थान आहे. तरी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या मार्गदर्शनानूसार अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी आरोग्यदायी कर्मचारी-सक्षम प्रशासन-समृध्द जिल्हा या संकल्पनेला मुर्त स्वरुप देण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवनात सोमवार दि.१ सप्टेंबर २०२५ पासुन दररोज सकाळी १० ते १०.२० या वेळेत ध्यान साधनेचे आयोजन करण्यात येत आहे. कार्यालयीन कामकाजाची गती वाढविण्यासाठी ध्यानसाधना हा सर्वात सोपा, वैज्ञानिकदृष्ट्या सिध्द आणि सर्वांना उपयुक्त ठरणारा उपाय आहे. असे यावेळी सांगितले.

**दि जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., जालना.**

**जाहीर - नम्र निवेदन**

**बँकेच्या संगणकीय प्रणालीचे अपग्रेडेशन व सायबर सुरक्षा प्रणालीचा अवलंब करुन बँकेच्या ग्राहकांना सायबर सुरक्षित व नविन संगणकिय सुविधा पुरविणेसाठी बँकेचे मुंबई येथील डाटा सेंटर मधील बँकिंग प्रणाली व हार्डवेअर याचे अपग्रेडशन व स्थानांतरण दि.०५/०९/२०२५ शुक्रवार रोजी रात्री १०.०० पासुन दि.०७/०९/२०२५ सकाळी ०६.०० वाजे पर्यतच्या कालावधी मध्ये होणार आहे. करीता सदरील वेळेतबँकेचे दैनंदिन बँकिंग व्यवहार बंद राहतील, याची बॅकेच्या ग्राहकांनी कृपया नोंद घ्यावी.**

**दि.०१/०९/२०२५ आदेशावरुन**

जाहिर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ८७/२०२५**
**सदाशिव अण्णाराव उबाळे**
**विरुद्ध ग्रामपंचायत कार्यालय चऱ्हाटा**

पहा

१.सदाशिव अण्णाराव उबाळे रा. चऱ्हाटा ता. जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्ममृत्यु नोंद दावा प्रकरण विधिज्ञ मार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून मयत अण्णा राजाराम उबाळे यांचा दिनांक ०५/०१/१९७९ रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्ममृत्यू नोंदवही मध्ये घेण्याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की. सदरहून येस जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय /न.प कार्यालयस चऱ्हाटा ता. बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदर होऊन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे चऱ्हाटा ता. जि. बीड येथील जन्ममृत्यू रजिस्टर ला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनाक २८/०८/२०२५ रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख २८/०९/२०२५ ही आहे

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार, बीड**

जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**

**दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-३६६**
**दिनांक -२९/०८/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती संजय सुदाम खुळे रा. अंबड ता.अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगी जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मि ळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | कृष्णा संजय खुळे | मुलगी | १०/०५/२००० |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-२९/०८/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# ओबीसीमधून मराठा समाजाला आरक्षण देऊ नका यासाठी अंतरवाली सराटी येथे उपोषण सुरू

अंबड। प्रतिनिधी

मराठा समाजाला ओबीसी मधून आरक्षण देऊ नका यासाठी अंबड तालुक्यातील मनोज जरांगे यांच्या गावामध्ये अंतरवाली सराटी इथे आजपासून उपोषण सुरू करण्यात आले. मराठा समाजाला ओबीसी मधुन आरक्षण देण्यात येऊ नये, ज्या कुणबी नोंदी सापडलेल्या आहेत त्यांना प्रमाणपत्र देऊ नये, निवृत्त न्यायमुर्ती संदीप शिंदे समीतीला मुदत वाढ देण्यात येऊ नये, हैदराबाद ,सातारा, संस्थानचे गॅझेटियर लागु करू नये आदी मागणी साठी सोनिया नगर अंतरवाली सराटी येथे ओबीसी आरक्षण बचाव करीता उपोषण १ सप्टेंबर पासून सुरु करण्यात आले आहे. या ठिकाणी प्रा.विठ्ठल तळेकर मानवत, बाळासाहेब दखणे अंतरवाली सराटी, बाबासाहेब बटुळे नालेवाडी , श्रीहरी निर्मळ पाथरवाला, आसाराम डोंगरे छ.संभाजीनगर, यांनी उपोषण सुरु केल आहे.

ओबीसीच्या आरक्षणातील घुसखोरी थांबली पाहिजे ओबीसी चे आरक्षण हे संविधानीक आहे ५८ लाख नोंदी बोगस आहे जे आरक्षण सामाजिक मागलेपणाचे आहे त्या आरक्षणात मनोज जरांगे घुसखोरी करीत आहे. शासनाने मराठा समाजाला या मधुन आरक्षण देऊ नये आरक्षण बचाव करीता कायदेशीर



पध्दतीने उपोषण करत आहे असे उपोषण कर्ते प्रा.विठ्ठल तळेकर यांनी सांगितले ज्या ५८ लाख नोंदी सापडलेल्या आहे त्या बेकायदेशीर आहे याचा सविस्तर तपशील जाहिर केला पाहिजे असे उपोषण कर्ते बाळासाहेब दखणे यांनी सांगितले, ओबीसी आरक्षणाचे रक्षण होणे गरजेचे आहे मंडल आयोगाच्या माध्यमातून आम्ही ओबीसी आरक्षण बचाव करीता लढत आहे असे दोदडगाव येथील मंडल आयोगाचे निर्माते माजी आमदार नारायण मुंडे यांनी या वेळी सांगीतले तर मनोज जरांगे हे झुंडशाही पध्दतीने वागत आहे ओबीसी मधुन आरक्षण मागत आहे शासनाने ओबीसी मधुन आरक्षण देऊ नये करीता उपोषण करत आहे असे बाबासाहेब बटुळे यांनी सांगितले. सोनिया नगर अंतरवाली सराटी येथे उपोषण करण्यासाठी जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक यांना ३० अगस्ट रोजी निवेदन देण्यात आले होते त्या नुसार १ सप्टेंबर पासून या ठिकाणी उपोषण सुरु झाले आहे. या ठिकाणी अंतरवाली सराटी येथे मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून मनोज जरांगे दोन वर्षापासून आंदोलन करत आहे तर ओबीसी मधुन मराठा समाजाला आरक्षण देण्यात येऊ नये करीता अंतरवाली सराटी वडिगोद्री रोड वरील सोनिया नगर येथे ओबीसी आरक्षण बचाव करीता उपोषण होत आहे. सदरील उपोषण स्थळे मोठा प्रमाणात बंदोबस्त लावण्यात आला आहे.

cmyk

राज्य लोकतंत्र



# सिंदफणाच्या ६ मुलींची राष्ट्रीय स्पर्धेत थेट एंट्री



सी.बी.एस.ई. साऊथ झोन-२ मध्ये मारली बाजी

**माजलगाव । प्रतिनिधी**

**विद्याभवन शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सिंदफणा पब्लिक स्कूलच्या युवा क्रिकेटपटूंनी २०२५-२६ साऊथ झोन-२ सी.बी.एस.ई. क्रिकेट स्पर्धेत धमाकेदार कामगिरी करत राष्ट्रीय स्पर्धेत प्रवेश मिळवला आहे. या उत्कृष्ट यशामुळे शाळेवर सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.**

ध्रुव ग्लोबल स्कूल, संगमनेर येथे २७ ते ३१ ऑगस्ट दरम्यान आयोजित या महत्त्वाच्या स्पर्धेत सिंदफणा शाळेच्या १४, १७ व १९ वर्षाखालील मुले-मुलींनी सहभाग नोंदवला होता. या स्पर्धेतून अनेक खेळाडूंनी पदके मिळवून शाळेचे नाव उजळवले आहे.१४ वर्षाखालील मुलांमध्ये आर्यन बनसोडे याने कांस्यपदक पटकावले आहे. १७ वर्षाखालील मुलींच्या गटात मानसी जगताप, अनन्या मुंडे, रिद्धी डाके, पूर्वा मालानी, संस्कृती मळवाडे, श्रेया जाधव आणि वेदिका गवते या सात खेळाडूंनी रौप्यपदक मिळवले आहे. तसेच या गटातीलच शेजल विभुते आणि कार्तिकी सुरवसे या दोन आणि १९ वर्षाखालील मुलींच्या गटातून आरुषी कुलकर्णी, अक्षरा सोळंके, अनुष्का सोळंके आणि रोहिणी मीटे या चार प्रतिभावान खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत राष्ट्रीय क्रिकेट संघात स्थान मिळवले आहे. मध्यप्रदेशच्या भोपाळ येथे होणाऱ्या सी.बी.एस.ई. राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेत हे खेळाडू महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळविली आहे.

या अभूतपूर्व यशाबद्दल शाळेचे अध्यक्ष मा. आमदार प्रकाशदादा सोळंके, सचिव मंगलाताई सोळंके, उपाध्यक्ष वीरेंद्र सोळंके, समन्वयक नीला देशमुख, प्राचार्य अन्वर शेख आणि उपप्राचार्य राहुल कदम, शैक्षणिक विभाग प्रमुख जीबी, ऑगस्टन, सुनिता सुरवसे धनंजय सोमवंशी,अर्चना जाधव, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सर्व खेळाडूंचे हार्दिक अभिनंदन केले आहे. खेळाडूंना उत्कृष्ट मार्गदर्शन करणारे मुख्य प्रशिक्षक सचिन मंजुळे, क्रीडा शिक्षक दीपक माने, पुरुषोत्तम सोळंके आणि वैशाली सोळंके यांच्या योगदानाचेही

◀◀ पान २ वर

# अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे सरसकट पचनामे करा - प्रा.आंधळे

केज । प्रतिनिधी

केज तालुक्यामध्ये १५ जुलै नंतर पावसाचा जोर वाढत गेला मागच्या काही दिवसात तर शेतातील पिकाचे भयानक नुकसान झाले अनेक ठिकाणी अजूनही शेतामध्ये पाणी साचलेले आहे त्यामुळे खरीप पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे या झालेल्या नुकसानीचे सरसकट पंचनामे करण्यात यावेत अशी मागणी ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी एका प्रसिद्ध पत्रकाद्वारे केली आहे यावेळी मंडळ आणि गाव निहाय झालेल्या नुकसानीचा आढावा घेणे गरजेचे आहे पावसामुळे ग्रामीण व शहरी भागात घरांची झालेली पडझड पशूंची झालेली हानी यावर स्वतंत्र पंचनामे करण्याची गरज आहे तसेच स्थानिक आपत्ती निवारण निधीतून संसार उपयोगी साहित्याचे नुकसान झाले असल्यास याबाबतचे तात्काळ द्यावयाच्या अनुदान नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना देण्यात यावे अनेक ठिकाणी पावसामुळे रस्ते वाहून गेले आहेत व खचले आहेत अशा रस्त्यांची सार्वजनिक



बांधकाम विभागाने तात्काळ दुरुस्ती करण्याचे प्रस्ताव तयार करणे गरजेचे आहे महावितरणच्या विविध उपकेंद्र अंतर्गत पावसाने झालेले नुकसान पोल किंवा तारा तुटण्याचे प्रकार याबाबत गावातील सरपंच किंवा प्रशासकीय अधिकारी यांनी कळविले तरी त्याबाबतीत तातडीने क्शन घ्यावी जेणेकरून कुठलेही गाव अंधारात राहणार नाही अशी मागणी ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी एका प्रसिद्ध पत्रकाद्वारे केली आहे कार्यवाही लवकरात लवकर नाही केली तर ग्रामीण युवक संघटनेच्या माध्यमातून मा. जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात येईल असे आवाहन केले आहे

# पाटोद्यात पोलीस कर्मचारी तांदळे दोन हजाराची लाच घेताना पकडला

पाटोदा । प्रतिनिधी

जिल्ह्यातील वाळूचे हायवा सुसाट धावत आहे त्यासाठी पोलीस कर्मचारी पाच ते दहा हजार रुपये नव्हे तर वीस हजार रुपये छापता असल्याची माहिती लाच प्रतिबंधक विभागाच्या कारवाईतील समोर आले आहे पाटोदा पोलीस ठाणे हद्दीत वाळूचे हायवा सुरू ठेवण्यासाठी २०००० ची लाज घेताना ठाण्यातीलच पोलीस कर्मचारी सचिन तेंडुलकर पकडण्यात आला पाटोदा पोलीस ठाणे हद्दीत वाळूची वाहतूक करण्याच्या मोबदल्यात प्रत्येक महिन्याला वीस हजार रुपयांचा हप्ता रोख स्वरूपाच्या लाचेची मागणी पोलीस कर्मचारी सचिन तांदळे यांनी वय ४५ राहणार तुळजाई नगर बीड नेमणूक पोलीस ठाणे पाटोदा यांनी केल्याची तक्रार संबंधित तक्रारदाराने लाचविरोध प्रतिबंध विभागाकडे केली होती त्या अनुषंगाने नाशिक पद प्रतिबंध विभागाचे अधिकार आणि पंचासमक्ष तकरीची पडताळणी केली असता तांदळे यांनी तक्रारीच्या हव्या गाडीतून वाळूची वाहतूक करण्याचे मोबदल्यात प्रत्येक महिन्या ला सदराचे हप्त्याची मागणी केली केल्याने समोर आले आहेत त्यानुसार लाच प्रतिबंधक विभागाचे अधिकार आणि एक सप्टेंबर रोजी २०२५ सापळा लावून तक्रारदाराकडून २०००० ची लाच घेताना पोलीस कर्मचारी सचिन तांदळे यास पाठवता पोलिसांनी रंगी हात ताब्यात घेतले ठाण्यासमोरील आंबेडकर चौकातून ताब्यात घेण्यात आले त्याविरुद्ध पाटोदा पोलीस ठाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू

◀◀ पान २ वर

# मराठा समाजाला आरक्षण मिळताच आष्टीमध्ये आनंद उत्सव

आष्टी । प्रतिनिधी

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात देविदास आबा धस युवा नेते श्याम भैय्या धस मराठा बांधवांनी पारंपरिक वाद्याचा गजर करत गुलाबाची उधळण करत आरक्षण मिळाल्यानंतर जल्लोष केला मुंबई येथे संघर्ष यात्रा मनोज दादा जरांगे पाटील यांनी मराठ्याला आरक्षण मिळावे म्हणून आझाद मैदान येथे उपोषण सुरू केले होते आज यश आले आहे महाराष्ट्र सरकारने आरक्षण व समिती स्थापन केली होती या उपसमितीमध्ये नामदार राधाकृष्ण



विखे पाटील नामदार शिवेंद्र राजे भोसले जयकुमार गोरे यांची नेमणूक केली होती या समितीने मराठा आरक्षण प्रश्न संपूर्ण अभ्यास करून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे अजित दादा पवार यांच्या अधिपत्याखाली मराठ्यांना हैदराबाद लागू केले लागू होताच आष्टी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात सर्व मराठा बांधवांनी पारंपरिक वाद्याचा गजर करत गुलालाची उधळण करत आनंद उत्सव साजरा केला महाराष्ट्र सरकारमधील भारतीय जनता पार्टीचे आमदार सुरेश आण्णा धस यांनी मनोज दादा जरांगे पाटील यांच्या आमरण उपोषणाला भेट देऊन आपला पाठिंबा दर्शवला गेल्या ७५ वर्षापासून वंचित असलेले मराठा समाजाला ओबीसीतुन आरक्षण मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे याबद्दल सर्व मराठा बांधवांनी पेढे वाटून आनंद व्यक्त केला.

# जरांगे पाटलांच्या मागणीला यश, मोठेवाडीत फटाके फोडुन जल्लोष

**माजलगाव । प्रतिनिधी**

**संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला यश आले, हैद्राबाद गॅझेटमधील कुणबी नोंदी ग्राह्य धरण्याचा अध्यादेश पारीत करण्यात येत असल्याबद्दल माजलगाव तालूक्यातील मोठेवाडी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात तरूणांनी फटाके फोडुन व गुलालाची उधळण करीत जल्लोष साजरा केला.**



संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांनी मुंबई येथील आझाद मैदानावर आमरण उपोषण केले, या उपोषणाचे आंदोलन मागील पाच दिवसांपासून सुरू होते, या आंदोलनात गंगामसला परिसरातील शेकडो आंदोलक सहभागी झाले होते. आंदोलनातील मागण्या मान्य झाल्यामुळे गावकऱ्यांनी हलगी, तोफा, फटाके फोडुन, गुलालाची उधळण करत छत्रपती शिवाजी महाराजांचा जयघोष करीत एक मराठा लाख मराठा या जय घोष करत आनंद व्यक्त केला. यावेळी मोठेवाडी येथील मराठा तरूणांची मोठी उपस्थिती होती.

# गणपती उत्सवाप्रमाणे आपले जीवनही आनंदी आणि उत्साही असावं- पोलिस अधीक्षक नवनित कॉवत

बीड । प्रतिनिधी

जिवनात शिस्त आणि सकारात्मक दृष्टिकोन जोपासणे महत्वाचे आहे, गणपती उत्सवाप्रमाणे आपले जीवनही आनंदी आणि उत्साही असावं. ताणतणावात जगण्याऐवजी तणावमुक्त जीवन जगणं हीच खरी प्रगती आहे. असे प्रतिपादन बीड जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक नवनित कॉवत यांनी केले. ते आदित्य शिक्षण संस्थेमध्ये श्रींच्या आरती प्रसंगी विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद



साधताना बोलत होते. यावेळी संस्थेच्या वतीने संचालक डॉ.आदित्य सारडा,आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा, सी. ए. गिरीशजी गिल्डा यांनी एसपी नवनित कॉवत यांचा सत्कार केला.

आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या गणेशोत्सवाचे औचित्य साधून मंगळवारी पोलिस अधीक्षक नवनित कॉवत यांच्या हस्ते श्रींच्या आरतीचा भव्य कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

यावेळी आदित्य डेंटल कॉलेज चे प्राचार्य डॉ.हिमांशू , आदित्य आयुर्वेद चे प्राचार्य डॉ. विवेक कुलकर्णी, आदित्य कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य श्याम भुतडा, आदित्य कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सतीश कचरे, आदित्य कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल सानप, आदित्य नर्सिंग महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विकास गर्जे, आदित्य फिजिओथेरपी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.बालाजी बहिरवाल यांच्यासह सर्व महाविद्यालयाचे प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी पोलिस अधीक्षक

◀◀ पान २ वर

## छत्रपती संभाजीनगरात डिजीटल मीडिया पत्रकारांचे राज्यव्यापी अधिवेशन १४ सप्टेंबर रोजी

बीड । प्रतिनिधी

मराठी पत्रकार परिषदेतर्फे डिजिटल मीडिया पत्रकारांचे राज्यव्यापी अधिवेशन रविवार, दिनांक १४ सप्टेंबर २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगरात होत आहे. हे अधिवेशन मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त तथा, राज्यातील तमाम पत्रकारांचे आधारस्थान मा. एस. एम. देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली होत आहे. येथील उस्मानपुरा भागातील संत एकनाथ रंगमंदिरात सकाळी ११ वाजता अधिवेशनास सुरुवात होईल. अधिवेशनाला परिषदेचे विश्वस्त किरण नाईक, प्रदेश अध्यक्ष मिलिंद आष्टीवकर, विश्वस्त शरद पाबळे, प्रदेश सरचिटणीस प्रा.सुरेश नाईकवाडे, डिजीटल मीडिया परिषदेचे प्रदेश अध्यक्ष अनिल वाघमारे, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, कोषाध्यक्ष मन्सूर शेख यांची प्रमुख उपस्थिती राहील.

अधिवेशनाची तयारी अंतिम टप्प्यात असून, यासाठी मार्गदर्शक धनंजय लांबे, डॉ. अनिल फळे, डॉ. अब्दुल कादीर, संजय वरकड, शिवनाथ राठी, प्रकाश जोशी, स. सो. खंडाळकर, माणिक साळवे, शांतीलाल गायकवाड, सुनीलचंद्र वाघमारे, प्रकाश भगनुरे, कानीफ अन्नपूर्णे, माधव जामनिक, खंदारे दादा, बालाजी सूर्यवंशी परिश्रम घेत आहेत.

# तलवाडा येथील सार्वजनिक बारव ते बसस्थानक रस्ता रुंदीकरण होईल का?

तलवाडा । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील गाव तलाव संरक्षण भींती लगट वाढलेल्या आतिक्रमणामुळे रहदारीच्या मुख्य रस्त्याला देखील अडथळा निर्माण होत असुन गेवराई ते तलवाडा मार्गे या भागातील गाववायीज बाहत्तर फे-या दिवसभरात परिवहन विभागाच्या होत आसल्याने बस चालकांचा जिव तलवाडा बस स्थानक कडे जाताना मेटाकुटीला येत असल्याचे बस चालकातुन बोलले जात असुन अनेक वेळा ओळखीचे पत्रकार व गाव पुढा-यांना बस चालकांनी हा रस्ता रुंदिकरण करण्या संदर्भात विनंती केलेली आहे. यातच दिनांक १७/८/२०२५ रोजी भरधाव वेगात दोन्ही बाजुने आचानक वाहने आल्याने एका व्यक्तीस जिव



वाचवण्यासाठी रोडच्या बाजूला ऊडी मारावी लागली होती सुदैवाने जिवितहानी टळली असलीतरी बस चालकातुन संताप जनक प्रतिक्रिया व्यक्त होऊ लागल्याचे ऐकावयास मिळत असुन या रस्त्याने सातत्याने शाळकरी विध्यार्थ्यांसह ईतर वाटसरुंची मोठ्या प्रमाणात वर्दळ आसते त्या दिवशी सुदैवाने शाळेला सुट्टी होती. नस्ता मोठी दुर्घटना झाली असती. याच मुख्य डांबरी रस्त्या लगट तलवाडा तलावाच्या बाजूला पिण्याचा पाण्याची सार्वजनिक बारव असुन गावातील माता माऊलींना या वर्दळीतुन वाट काढत या पाण्यासाठी बारव या ठिकाणी ये जा करावी लागते. या सर्व बाबी गांभीर्याने घेण्या ऐवजी स्थानिक प्रशासन मुठभर लोकांचे आतिक्रमण वाचवण्यासाठी गावातील महिला वाटसरुंना व वाहन चालकांना वेठीस धरून मॅनेजमेंटची भुमीका स्विकारत आसल्याच्या चर्चेला सध्या उधाण आल्याचे ऐकावयास मिळत आहे. रस्ता रुंदिकरणाची स्थानिक प्रशासन एखाद्याचा जिव

◀◀ पान २ वर

# शिरूर तालुक्यात गावा-गावात आनंदाचा जल्लोष



**शिरूर । प्रतिनिधी**

गेल्या पाच दिवसापासून मनोज जरांगे पाटील मुंबई येथील आझाद मैदानावरती आमरण उपोषण करत होते. आज राज्य सरकार कडून जरांगे पाटलांच्या मागण्यांना हिरवा कंदील दाखवण्यात आल्याने मराठा समाजामध्ये मोठे आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. फटाक्यांची आतिषबाजी, गुलाबाची उधळण आणि ढोल ताशाचा निनाद आवाज हा आकाशाला गवसणी घालू लागला आहे.

जन्मभूमीत ही मोठा आनंद उत्सव

संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या जन्मभूमीत मौजे मात्र या गावांमध्ये आज मोठा आनंद उत्सव साजरा करण्यात आला असून गुलालाची उधळण करत,फटाक्यांची आतिषबाजी करून, घोषणाबाजी करून मोठा आनंद उत्सव साजरा केला आहे.

# कपास किसान मोबाईल ॲपद्वारे शेतकरी बांधवांनी कापूस विक्रीसाठी नोंदणी करावी

## अडचण आल्यास बाजार समितीशी संपर्क साधवा -सभापती नरवडे, उपसभापती मोरे

माजलगाव । प्रतिनिधी

भारत सरकारच्या वस्त्र मंत्रालयाच्या वतीने भारतीय कपास निगम लिमिटेड औरंगाबाद यांचे वतीने कपास किसान मोबाईल पची निर्मीती करण्यात आली असुन २०२५ - २६ या पिक वर्षात किमान आधारभूत किमंतीवर कापूस विकण्यासाठी कपास किसान मोबाईल पव्दारे शेतकरी बांधवांनी कापुस विक्रीसाठी नोंदणी करावी काही अडचण असल्यास बाजार समिती कार्यालयात कापूस विभागाशी संपर्क साधल्यास नोंदणी करून देण्यात येईल अशी





माहिती बाजार समितीचे सभापती जयदत्त अण्णा नरवडे, उपसभापती श्रीहरी मोरे,सचिव हरिभाउ सवणे यांनी दिली आहे.

माजलगाव तालुक्यातील सर्व कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी कापूस हंगाम २०२५ - २६ करीता केंद्र सरकारने हमीभावाने कापूस विक्री करण्यासाठी कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी कापसाची विक्री करण्यासाठी कपास किसाननावाचे मोबाईल प दि.३१ ऑगस्ट २०२५ पासून उपलब्ध केलेले आहे.कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी कपास किसाननावाचे प आपल्या मोबाईल मध्ये डाऊनलोड करून दि.०१ सप्टेंबर २०२५ ते दि.३० सप्टेंबर २०२५ पर्यंत नोंदणी करून घ्यावी दि ३० सप्टेंबर ही नोंदणी करण्याची अंतिम मुदत आहे.दि ३० सप्टेंबर नंतर नोंदणी करता येणार

◀◀ पान २ वर

# मराठा आरक्षणाच्या मागण्या मान्य करताच वडवणीत दिवाळी साजरी

वडवणी । प्रतिनिधी

अनेक वर्षे झाले मराठा आरक्षण मिळवण्यासाठी संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांनी आपल्या कुटुंबाची व जीवाची परवा न करता प्राणांतीक उपोषण केली.गेली २९ ऑगस्ट पासुन मुंबई येथे अन्न पाणी त्याग करत ऊपोषण सुरु केले.संपूर्ण मुंबई जाम केली.सरकारला ना इलाजास्तव मनोज दादा जरांगे पाटील यांच्या मागण्या पूर्ण कराव्या लागल्या सरकारने



मराठा आरक्षणाच्या मागण्या मान्य करताच वडवणी शहरासह ग्रामीण भागातील समाज बांधवांनी गुलालाची उधळण करत फटाक्यांची आतिषबाजी करत दिवाळी साजरी केली.

गोरगरीब मराठा समाजाला हक्काचे ओबीसीतून आरक्षण मिळावे यासाठी संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील हे गेले अनेक वर्षापासून आपल्या कुटुंबाची व जीवाची परवाना करता प्राणांतिक उपोषण केली.त्यांच्या आरक्षणाच्या लढ्याला समाजबांधवांनी मोठा प्रतिसाद देत त्यांच्या मागे मोठी ताकद निर्माण केली.गेली २७ ऑगस्ट पासून चलो मुंबई मोर्चाचा नारादेत लाखोंच्या जनसामुदाय सोबत घेत आझाद मैदान येथे शुक्रवार दि २९ ऑगस्ट पासून अन्नपाणी त्याग करत

◀◀ पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

# जेजुरी विकास आराखड्यातील कामे तत्काळ पूर्ण करा; विजय शिवतारे यांचे निर्देश

**सासवड । प्रतिनिधी**

श्रीक्षेत्र जेजुरी गड तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करा. जिथे स्थानिक अथवा प्रशासकीय अडचणी असतील तिथे संबंधित यंत्रणांची मदत घेतली जाईल. मात्र, तातडीने कामे पूर्ण करा; जेणेकरून दुसर्या व तिसर्या टप्प्यातील कामांसाठी राज्य शासनाकडून निधी मागणी करता येईल, असे निर्देश आमदार विजय शिवतारे यांनी पुरातत्व विभाग आणि सार्वजनिक बांधकाम विभागाला सोमवारी (दि. १) दिले.




सासवड (ता. पुरंदर) येथे प्रशासकीय इमारतीत जेजुरीगड तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील कामांची आढावा बैठक आमदार विजय शिवतारे यांच्या उपस्थितीत पार पडली, त्या वेळी शिवतारे बोलत होते.

या वेळी तहसीलदार विक्रम राजपूत, पुरातत्व विभागाचे सहाय्यक संचालक विलास वहाने, देवस्थानचे मुख्य विश्वस्त मंगेश घोणे, जेजुरी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी चारुदत्त इंगोले, सार्वजनिक बांधकाम विभागाचे शाखा अभियंता ओंकार रेलेकर, शिवसेनेचे तालुकाप्रमुख हरिभाऊ लोळे, अतुल म्हस्के, सचिन भोंगळे, देवस्थानचे विश्वस्त अनिल सौंदडे, विश्वास पानसे, देवस्थानचे कार्यकारी अधिकारी आशिष बाठे आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते. या वेळी कडेपठार, खंडोबा मंदिर, लवथळेश्वर, बल्लाळेश्वर आणि गौतमेश्वर मंदिर परिसरातील कामांचा आढावा घेण्यात आला. शहरातील महाद्वार रस्ता दगडी पद्धतीने करण्याबाबत सूचना देण्यात आली.

गडावरील दीपमाळा भाविकांनी अथवा व्यापार्यांनी बांधलेल्या दोर्या किंवा खिळे ठोकल्याने कमकुवत झाल्या आहेत. याबाबत सक्त सूचना संबंधितांना द्याव्यात आणि आवश्यकता भासल्यास पोलिसांचे सहकार्य घ्यावे, अशी सूचना शिवतारे यांनी केली. टप्पा २ व ३ मधील निधीची लवकरात लवकर मागणी करणार आहे. त्यासाठी सध्या चालू असलेली कामे तातडीने पूर्ण करावीत, असे शिवतारे यांनी सांगितले.

**५२९ कोटींचा निधी**

मार्तंड देवस्थान विकासासाठी ३४९, जेजुरी पाणीपुरवठा योजनेसाठी ७८, भूमिगत गटार योजनेसाठी ८२, रस्ते विकास कामांसाठी ५.६०, भक्तनिवासासाठी ५, पार्किंगसाठी १, पाणीपुरवठा दुरुस्तीकरिता ७.६० कोटी अशा प्रकारे एकूण ५२९ कोटींचा निधी जेजुरीच्या सर्वांगीण विकासासाठी आणण्यात आला आहे. गटार योजना लवकरच मार्गी लावण्यात येईल. जेजुरी नगरपरिषदेत सत्ता मिळाल्यास केंद्र व राज्य शासनाच्या सहकार्यातून जेजुरीचा विकास अधिक वेगाने, नियोजनबद्ध आणि सर्वसमावेशक पद्धतीने करता येईल, असे शिवतारे म्हणाले

# पुणे कॅन्टोन्मेंट सहकारी बँकेच्या संचालकपदी जीवन म्हेत्रे यांची बिनविरोध निवड

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे कॅन्टोन्मेंट सहकारी बँक लि. पुणेच्या सर्वसाधारण गटामधील संचालकपदी जीवन दत्तात्रय म्हेत्रे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. त्यांना सर्वसाधारण गटामधील संचालक पदाच्या निवडीचे पत्र निवडणुक अध्यासी अधिकारी श्रीमती निलम पिंगळे तसेच बँकेचे अध्यक्ष कैलास कोद्रे यांनी दिले. याप्रसंगी बँकेचे अध्यक्ष यांनी तरूणांनी बँकेच्या विकासासाठी सक्रिय सहभागी व्हावे असे मत व्यक्त केले.



जीवन दत्तात्रय म्हेत्रे हे सहजपुर व ऊरळी कांचन परिसरातील सामाजिक कार्यकर्ते आहे. त्यांना दौंड कृषी उत्पन्न बाजार समितीवर संचालक म्हणुन कामाचा अनुभव आहे. या परिसरातील विविध सामाजिक संस्थामध्ये, सार्वजनिक मंडळामध्ये व क्रीडा क्षेत्रात कार्यरत आहेत.


यावेळी बँकेचे अध्यक्ष कैलासराव सखाराम कोद्रे, उपाध्यक्ष, साहेबराव विठ्ठलराव लोणकर, स्मिता शैलेश लडकत (वोर्ड ऑफ मॅनेजमेंट अध्यक्षा), संचालक, कैलास रामचंद्र कोद्रे, मंगल शिवाजीराव टिळेकर, शांताराम कोंडिराम चौधरी, नंदकिशोर तुकाराम विडकर.

तसेच देवेंद्र सुरेश भाट, ॲड. अविनाश केरवा कवडे, ॲड. दिलीप महादेव जगताप, संदीप कैलासराव कोदे, अनिल जगन्नाथ आबनावे, ज्ञानेश्वर रामभाऊ मोझे, किशोर फत्तु संघेलिया, संतोष मधुकर पेठे, अमित अजित गिरमे, जीवन दत्तात्रय म्हेत्रे तसेच सेवक प्रतिनिधी वाळु पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी अरूण जवळकर, महाव्यव्यवस्थापक अस्लम तांबोळी उपस्थित होते. याप्रसंगी उपाध्यक्ष साहेबराव लोणकर व संचालक कैलास रामचंद्र कोद्रे तसेच अविनाश कवडे यांनी मनोगत व्यक्त करून नवनिर्वाचित संचालकांचे अभिनंदन केले. तसेच उपाध्यक्ष साहेबराव लोणकर यांनी आभार मानले.

# आरोपी गाडेचा जामीन अर्ज कोर्टाने दुसऱ्यांदा फेटाळला

**पुणे । प्रतिनिधी**

स्वारगेट स्थानकात शिवशाही बसमध्ये काही महिन्यांपूर्वी २६ वर्षीय तरुणीवर बलात्कार केल्याप्रकरणातील आरोपी दत्तात्रेय गाडे दुसऱ्यांदा जामीन अर्ज फेटाळण्यात आला आहे. परिस्थितीत कोणताही बदल झालेला नाही. आरोपी सराईत गुन्हेगार असून, त्याने महिलेवर लैंगिक अत्याचारासारखा गंभीर गुन्हा केला आहे. त्याला जामीन दिल्यास तो गुन्हा करू शकतो, असा युक्तिवाद सरकार पक्षाकडून करण्यात आला आहे. सरकारी पक्षाचा युक्तीवाद ग्राह्य धरत न्यायालयाने गाडेचा जामीन अर्ज दुसऱ्यांदा फेटाळला. अतिरिक्त सत्र न्यायाधीश अनिरुद्ध गांधी यांनी हा याबाबतचा निकाल दिला आहे.



स्वारगेट स्थानकातील शिवशाही बसमध्ये आरोपी दत्तात्रेय गाडे याने तरुणीवर दोन वेळा बलात्कार केल्याची घटना २५ फेब्रुवारी रोजी पहाटेच्या सुमारास घडली होती. या प्रकरणी गाडेविरोधात स्वारगेट पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. त्याच्याविरोधात ८९३ पानांचे आरोपपत्र पुणे न्यायालयात दाखल करण्यात आले आहे. या गुन्ह्यात न्यायालयीन कोठडीत असलेल्या गाडेने ॲड. वाजेद खान बीडकर यांच्यामार्फत जामीन मिळण्यासाठी केलेला पहिला अर्ज सत्र न्यायालयाकडून ३० जून रोजी फेटाळण्यात आला होता. त्यानंतर अवघ्या पंधरा दिवसांच्या कालावधीत गाडेने पुन्हा एकदा आपल्या वकिलांमार्फत दुसरा जामीन अर्ज न्यायालयात सादर केला. हा बलात्कार नसून, परस्पर सहमतीने संबंध आहेत. आरोपीची पत्नी व दोन मुले त्याच्यावर अवलंबून आहेत. या प्रकरणी तपास पूर्ण झाला असून, आरोपपत्र दाखल झाले असल्याने परिस्थितीत बदल झाला आहे. या आधारावर आरोपीला जामीन द्यावा, असा युक्तीवाद ॲड. वाजेद खान बिडकर यांनी केला होता. त्याला विशेष सरकारी वकील अजय मिसार आणि प्रकरणातील पिडीत तरुणीच्या वकील श्रिया आवले यांनी विरोध दर्शविला. त्यानंतरच्या युक्तीवदावर गाडेचा जामीन फेटाळण्यात आला आहे.

# मॉडर्न महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी डॉ. निवेदिता एकबोटे यांची नियुक्ती

**पुणे । प्रतिनिधी**

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या शिवाजीनगर येथील मॉडर्न कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी डॉ. निवेदिता एकबोटे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. आर. एस. झुंजारराव यांच्याकडून त्यांनी मंगळवारी पदभार स्वीकारला. या नियुक्तीमुळे डॉ. एकबोटे या मॉडर्न महाविद्यालयाच्या पहिल्या महिला प्राचार्य ठरल्या आहेत.




या निमित्ताने संस्थेच्या सभागृहात आयोजित विशेष कार्यक्रमात त्यांनी प्राचार्यपदाची सूत्रे स्वीकारली. यावेळी संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, सचिव प्रा. शामकांत देशमुख, सहसचिव डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, माजी प्राचार्य डॉ. आर. एस. झुंजारराव आणि कुलसचिव प्रा. गणेश साठे आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

डॉ. निवेदिता एकबोटे म्हणाल्या, संस्थेने दूरदृष्टीने दिलेली ही मोठी जबाबदारी आहे. सर्वांच्या सहकार्याने महाविद्यालयाचा नावलौकिक आणखी उंचवण्याचा माझा प्रयत्न राहील. काळानुसार महाविद्यालयात काही आवश्यक बदल करत कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) स्वतंत्र विभाग सुरू करण्याचा माझा मानस आहे. यावेळी संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे म्हणाले, डॉ. झुंजारराव यांनी महाविद्यालयाची पायाभरणी केली आहे. आता पहिल्या महिला प्राचार्य म्हणून डॉ. निवेदिता यांच्या कार्याकडे सर्वांचे लक्ष असेल. त्यांचा पहिल्या महिला प्राचार्यांपासून ते भविष्यायत पहिल्या महिला कुलगुरूंपर्यंतचा प्रवास यशस्वी राहील, असा मला विश्वास आहे. माजी प्राचार्य डॉ. झुंजारराव यांनी आपल्या भाषणात, महाविद्यालयाने सामाजिक बांधिलकी जपत गरजू आणि गरीब विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडवण्यावर लक्ष केंद्रित करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. प्रास्ताविक प्रा. शामकांत देशमुख यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. वैजयंती जाधव यांनी केले, तर उपप्राचार्य डॉ. अंजली सरदेसाई यांनी आभार मानले.

# महापालिका शाळा ज्ञानासोबतच क्रीडा संस्कृतीतही आघाडीवर रग्बीमध्ये राज्यस्तरीय रौप्यपदक तर स्क्वॅशमध्ये विभागीय पात्रता महापालिका शाळांची दुहेरी कामगिरी

पिंपरी । प्रतिनिधी

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे .नुकत्याच शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी, पुणे येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत महापालिकेच्या शाळांनी रग्बी व स्क्वॅश या खेळांमध्ये ऐतिहासिक यश संपादन केले.




या स्पर्धेत कै. दत्तोबा रामचंद्र काळे इंग्लिश मीडियम स्कूल, काळेवाडी येथील विद्यार्थी दया जाधव, अबुजर अन्सारी आणि सुमित गायकवाड यांनी पुणे जिल्हा रग्बी संघाचे प्रतिनिधित्व केले. या संघाने एकूण सात सामने खेळत राज्यस्तरीय स्पर्धेची अंतिम फेरी गाठली आणि बीड संघाविरुद्धच्या चुरशीच्या लढतीत १-२ अशा फरकाने उपविजेतेपद पटकावले. पुण्याच्या वतीने झालेल्या या सामन्यातील एकमेव ट्राय दया जाधवने नोंदवत आपले क्रीडा कौशल्य दाखवून दिले. महापालिकेच्या शाळांमधून राज्यस्तरावर प्रथमच मिळालेले हे रौप्यपदक विद्यार्थ्यांसाठी तसेच शहरासाठी ऐतिहासिक ठरले आहे.

तसेच श्रीमती अनुसयाबाई नामदेव वाघेरे इंग्लिश मीडियम स्कूल, पिंपरी येथील विद्यार्थ्यांनी स्क्वॅश या नव्याने समाविष्ट झालेल्या खेळात दमदार कामगिरी केली. सूरज मदने याने १४ वर्षाखालील गटात द्वितीय क्रमांक पटकावत रौप्यपदकासह विभागीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली. तर प्रथमेश कुंभार याने १७ वर्षाखालील गटात चौथा क्रमांक मिळवून विभागीय स्पर्धेत स्थान निश्चित केले. या यशामागे प्रशिक्षक सुशील सर यांचे मार्गदर्शन आणि शाळेचा सक्रिय पाठिंबा मोलाचा ठरला.

महापालिकेच्या शाळांमधून क्रीडा क्षेत्रात होत असलेली ही प्रगती विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे प्रतीक असून, शहरातील क्रीडा संस्कृतीस नवी दिशा देणारी ठरत आहे.

# पीएचडी ऑनलाइन अर्ज सादर करण्यास १० सप्टेंबरपर्यंत मुदत

पुणे । प्रतिनिधी

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात पीएचडी प्रवेश प्रक्रियेसाठी पुढील फेरी सुरू झाली आहे. या फेरीत सहभागी होण्यासाठी इच्छुकांना १० सप्टेंबर अखेर ऑनलाईन अर्ज सादर करावे लागतील.




प्रवेश प्रक्रियेत १०० गुण मुलाखतीसाठी राहणार आहे. अंतिम निकाल तयार करताना प्रवेश प्रक्रियेत परीक्षेच्या गुणांना अधिक महत्त्व दिले जाणार आहे. पीएचडी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी परीक्षेतील गुणांना ७० टक्के महत्त्व, तर मुलाखतीला ३० टक्के महत्त्व दिले आहे.

विद्यार्थ्यांनी नियोजित वेळेत आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे बंधनकारक आहे. संशोधन क्षेत्रात कारकीर्द करण्याची इच्छा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी ही प्रवेश परीक्षा महत्त्वाची आहे. खुल्या प्रवर्गासाठी १००० रूपये, तर राखीव प्रवर्गासाठी ८०० रूपये शुल्क आहे. पेट परीक्षेचे सर्व तपशील, अर्ज प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रांची यादी आणि परीक्षा वेळापत्रक हे अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. याची सविस्तर माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

# मोरवाडी येथे पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे करण्यात आले पुष्पवृष्टी करून भव्य स्वागत



पुणे । प्रतिनिधी

आयटीआयचे प्रशिक्षण सत्र २०२५ -२६ नव्याने सुरू झाले असून दिनांक २ सप्टेंबर रोजी विद्यार्थ्यांनी संस्थेमध्ये उपस्थित राहण्याचा पहिलाच दिवस होता.

प्रवेशित झालेले सर्व विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते, त्यावेळी सर्व विद्यार्थ्यांचे भव्य स्वागत करण्यात आले. पुष्पवृष्टी करून त्यांना प्रोत्साहित करण्यात आले व भेटवस्तू देण्यात आली.शशिकांत पाटील प्राचार्य यांनी विद्यार्थ्यांना तसेच उपस्थित राहिलेल्या पालकांना औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे महत्त्व सांगितले.

आयटीआय संस्था, केंद्र शासन, कौशल विकास व उद्योजकता मंत्रालय, डीजीटी यांच्या अखत्यारीत संपूर्ण कामकाज चालत असल्याबाबत माहिती दिली तसेच सर्व ट्रेडस च्या विद्यार्थ्यांना रोजगार करिता तसेच स्वयंरोजगार करिता उज्वल भविष्य असल्या बाबत नमूद केले..

महापालिकेने टाटा मोटर्स सोबत डीएसटी अंतर्गत करार केला आहे.

गटनिदेशक किसन खरात यांनी विद्यार्थ्यांना संस्थेचे नियमावली, विद्यार्थ्यांचे हजेरीचे महत्व तसेच शिस्त पालन बाबत मार्गदर्शन केले.

सर्व निदेशक यांनी प्रत्येकाचे नाव ओळख व ट्रेड बाबत माहिती सांगितली. सदर कार्यक्रमास संस्थेतील सर्व निदेशक, गटनिदेशक, कार्यालय अधीक्षक व कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते. प्रशिक्षणाच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांसोबत पालकही उपस्थित राहिल्यामुळे त्यांचेही आभार व्यक्त करण्यात आले.

# मोशी खाण परिसरातच घेतली विविध विभागातील अधिकाऱ्यांची एकत्रित बैठक

**पिंपरी । प्रतिनिधी**

**गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड शहरातील आठही क्षेत्रीय कार्यालयामार्फत एकत्रीत केलेल्या गणेश मूर्तीचें मोशी खाण येथील विसर्जन ठिकाणी महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी भेट देऊन पाहणी केली. गणेश विसर्जन काळात कोणतीही गैरसोय होऊ नये, तसेच विसर्जन सोहळा सुरळीत आणि सुरक्षित पार पडावा, यासाठी आवश्यक त्या सर्व सोयीसुविधा उपलब्ध करण्याचे निर्देशही अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यांनी यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.**



या पाहणी दौऱ्यावेळी महापालिकेचे सह शहर अभियंता अनिल भालसाखळे,उप आयुक्त अण्णा बोदडे, सचिन पवार,निलेश भदाणे,संदीप खोत, सिताराम बहुरे,मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, क्षेत्रीय अधिकारी निवेदीता घार्गे,अश्विनी गायकवाड,तानाजी नरळे,किशोर ननावरे,,पूजा दूधनाळे,सहाय्यक आयुक्त उमेश ढाकणे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच कार्यकारी अभियंता विजय भोजने,वैशाली ननावरे,चंद्रकांत मुठाळ,सुनिलदत्त नरोटे,सतीश वाघमारे,हेमंत देसाई,विजय जाधव, सहाय्यक आरोग्याधिकारी,आरोग्य निरीक्षक यांच्यासह महापालिकेच्या विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड शहरातील मोशी खाण हे एकत्रित मूर्ती विसर्जनाचे स्थळ असून या ठिकाणी दरवर्षी हजारो गणेशमूर्तींचे विसर्जन पार पडते. त्यामुळे येथे गणेश विसर्जनसाठी येणाऱ्या मूर्तींसाठी वाहतूक व्यवस्था, मनुष्यबळ,क्रेन, सुरक्षाव्यवस्था, स्वच्छता, पाणीपुरवठा, वीजपुरवठा, या

> गणेशोत्सव हा शहरातील सांस्कृतिक, धार्मिक आणि सामाजिक आयुष्याचा अविभाज्य भाग आहे.गणेश विसर्जन काळात नागरिकांची सुरक्षितता आणि आदर्श विसर्जन व्यवस्था ही महापालिकेची सर्वोच्च प्राथमिकता आहे. त्यानुसार सर्व विभागांनी एकत्रितपणे समन्वय साधून कार्य करणे आवश्यक आहे. नागरिकांनीही प्रशासनाला सहकार्य करून पर्यावरणपूरक पद्धतीने मूर्तीचे विसर्जन करावे.
>
> -प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.


बाबींची काटेकोर तयारी आवश्यक आहे,याचा सविस्तर आढावा अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यांनी संबंधीत अधिकाऱ्यांसोबत घेतला.यावेळी त्यांनी विसर्जनासाठी करण्यात आलेल्या तलावांची तयारी, पाण्याची उपलब्धता, पथदिवे, दिशादर्शक फलक,रस्त्यांची स्थिती, पार्किंगची सोय, पोलीस बंदोबस्त, अग्निशामक दलाची तैनाती याबाबत माहिती घेतली. तसेच कचरा व्यवस्थापन आणि स्वच्छतेसाठी आवश्यक ती यंत्रणा कार्यरत ठेवण्याचे आदेश दिले. मोशी खाण व्यतिरिक्त पिंपरी चिंचवड शहरातील इतरही विसर्जन स्थळांवर महापालिकेतर्फे सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. प्रत्येक स्थळी प्रकाशयोजना, पिण्याचे पाणी, वैद्यकीय सुविधा, सुरक्षा, वाहतूक नियोजन आणि आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी कृती दलाची नेमणूक करण्यात आली आहे.

मोशी खाण येथे झालेल्या पाहणीत दिलेल्या सूचनांनुसार सर्व संबंधित विभागांनी तातडीने कार्यवाही सुरू केली असून, गणेश विसर्जन काळात शहरवासीयांना सुरळीत, सुरक्षित आणि पर्यावरणपूरक सेवा देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

# आंबेगावमध्ये आंदेकर टोळीचा खुनाचा कट उधळला; भारती विद्यापीठ पोलिसांची मोठी कारवाई

**कात्रज । प्रतिनिधी**

भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन आणि गुन्हे शाखेच्या संयुक्त कारवाईत आंदेकर टोळीतील सदस्यांचा खुनाचा कट उधळण्यात आला आहे. गणेशोत्सव काळात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस पेट्रोलिंग करत असताना, आंबेगाव पठार येथील सुर्या चौकात दत्ता बाळू काळे (रा. गणेश पेठ, पुणे) हा संशयास्पदरीत्या वावरताना पोलिसांना आढळला.




तपासाअंती समोर आले की, सप्टेंबर २०२४ मध्ये झालेल्या वनराज आंदेकरच्या हत्येचा बदला घेण्यासाठी आंदेकर टोळीने कट रचला होता. त्यासाठी दत्ता काळे याला आंबेगाव पठार भागात रेकीसाठी पाठवण्यात आले होते. या प्रकरणी भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास गुन्हे शाखेच्या युनिट ०१ कडून सुरू आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सहआयुक्त रंजनकुमार शर्मा, अपर पोलीस आयुक्त राजेश बनसोडे व पंकज देशमुख, उपआयुक्त निखील पिंगळे व मिलींद मोहीते, तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त राहुल आवारे यांच्या मार्गदर्शनाखाली भारती विद्यापीठ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल खिलारे, गुन्हे शाखेचे वरिष्ठ निरीक्षक कुमार घाडगे, अंजुमन बागवान, पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम तसेच उपनिरीक्षक निलेश मोकाशी व अंमलदार सागर बोरगे, मितेश चोरमोले, अभिनय चौधरी आदींच्या पथकाने केली.